# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ / आषाढ २०, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

### ठाणे व भिवंडी येथील कशेळी खाडीलगत भूमाफियांकडून कांदळवनाची होत असलेली अवैध कत्तल

**(१) * १००३९ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व भिवंडीच्या कशेळी खाडीलगत सर्व्हे क्र.१९८ येथील जमिनीवर मुंबई मा.उच्च न्यायालयाने कांदळवन संरक्षण व संवर्धनाचे स्पष्ट आदेश दिले असताना भूमाफीयांनी या सर्व आदेशांचे उल्लंघन करुन डेब्रिजचा भराव करून कांदळवनाची अवैध कत्तल सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कशेळी खाडीपासून ५० मीटर अंतरावरील बंदी क्षेत्रात चार डंपरने तब्बल १४ हजार ब्रास डेब्रिज या कांदळवन पट्ट्यात टाकल्यामुळे हजारो खारफूटीची कत्तल झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डंपरचालक विरोधात त्यांच्या नंबरसह नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चैकशी करुन हजारो खारफूटीची कत्तल करणाऱ्या भूमाफियांविरुद्ध तसेच सदर चारही डंपर चालकांविरोधात कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील स.क्र.१९८ या जमिनीवर डेब्रिजची भरणी केल्याने कांदळवानाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाबाबत दिनांक १७.०९.२०१८ रोजी आदेश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाने सदर आदेशानुसार कांदळवन हद्दीपासून ५० मी. बफरझोन मध्ये विकास कामांना प्रतिबंध करण्यात आला आहे.
(२) (३) व (४) मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील स.क्र.१९८ या कांदळवनालगत क्षेत्रात भराव केल्याचे निदर्शनास आल्याने भराव टाकणाऱ्या ट्रक मालक व चालक यांच्याविरुध्द नारपोली पोलीस ठाणे येथे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम १५ व १९ नुसार गुन्हा रजि.क्र.३८६/२०२३ दिनांक ०३ मे, २०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदी किनारी वन विभागाच्या जागेवर होत असलेले अवैध वाळू उत्खनन

**(२) * ११४६३ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात मांडवी बिटअंतर्गत बेळगांव राखीव वन गट क्रमांक ५३३ वैनगंगा नदी किनाऱ्यावरील वन विभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात रेती तस्करी करणाऱ्यांकडून अवैधरित्या रेतीचे उत्खनन होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २४ मे, २०२५ रोजीच्या पहाटे खमारी परिसरात अवैध उत्खनन करुन रेतीने भरलेले १५ ट्रॅक्टर पकडल्यानंतर वन परीक्षेत्र अधिकारी श्री.विलास बेलखोडे यांनी १३ ट्रॅक्टर मालकांकडून लाखो रुपये घेऊन कारवाई न करताच सोडून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करुन उक्त परिसरातील अवैध रेती उत्खनन रोखण्यासाठी व १३ ट्रॅक्टर सोडून देणाऱ्या वन परिक्षेत्र अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) भंडारा वन विभागांतर्गत नियतक्षेत्र मांडवी येथे मौजे बेलगांव गट क्र.१३३ राखीव वन क्षेत्रातून अवैध रेतीचे उत्खनन वाहतूक होत असल्याचे दिनांक १७.०५.२०२५ रोजी गस्ती दरम्यान निदर्शनास आले. त्यावेळी आढळून आलेल्या ५ ट्रॅक्टर पैकी २ ट्रॅक्टर चालकासह ताब्यात घेतले व ३ ट्रॅक्टर फरार झाले. सदर अवैध रेतीचे उत्खनन व वाहतूक प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २६ (१), ४१, ५२ अन्वये प्र.सु.री क्र.०३११७/७७९१८/०१/२०२५ दिनांक १७.०५.२०२५ अन्वये वनगुन्हा नोंदविला आहे.

त्याचप्रमाणे श्री.विलास बेलखोडे, वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यशैलीवर तसेच आर्थिक देवाण घेवाणीबाबतचे गंभीर आरोप करणारी बातमी स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १८.०५.२०२५ रोजी प्रसिध्द झाली होती.

प्रस्तूत प्रकरणात विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर यांच्या फेरचौकशी अहवालानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, भंडारा यांनी महसूल यंत्रणा / वरिष्ठांना अवगत न करता परस्पर २ ट्रॅक्टर सोडले, याकारणास्तव त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील), नियम, १९७९ चे नियम १० अंतर्गत दोषारोप बजावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील जमिनीचा भूमाफीयांनी ताबा घेतल्याबाबत

**(३) * ७२५५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वारस श्री.यशवंत भिमराव आंबेडकर यांची जमीन असून उक्त जमिनीवर भूमाफीयांनी कब्जा केला असून विनापरवाना तनिष्का रेसिडेन्सी ही इमारत बांधली असल्याचे दिनांक ९ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांची नावे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जमिनीच्या वारसदारांनी व जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन सेना कल्याण-डोंबिवली यांनी सदरची जमीन परत मिळावी अशी मागणी पोलीस उपायुक्त, पालिका आयुक्त, सहाय्यक आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका व तहसीलदार, डोंबिवली यांच्याकडे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील "९/आय" प्रभागक्षेत्राअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार श्री. यशवंत भिमराव आंबेडकर यांच्या मौजे-गोळवली, ता.कल्याण स.नं.६१/२/क, स.नं.८०/९/अ व स.नं. ८०/९/ब येथील जागेवर श्री. ललीत महाजन व इतर यांनी "तनिष्का रेसिडेन्सी" या इमारतीचे बांधकाम केल्याबाबत रिपब्लिकन सेना यांची तक्रार महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयात प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६० व २६७ (१) अन्वये नोटीस देऊन दिनांक १७/०२/२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळी विकासकांनी सदर इमारतीच्या अधिकृततेबाबत कोणतीही कागदपत्र सादर केली नसल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४७८ मधील तरतुदीनुसार दिनांक १४/०२/२०२३ च्या आदेशान्वये सदर इमारत महानगरपालिकेकडून अनधिकृत घोषित करण्यात आली होती.

तद्नंतर मौजे गोळवली, ता.कल्याण येथील स.नं.६१/२/क, स.नं.८०/९/अ व स.नं. ८०/९/ब या क्षेत्रावरील तनिष्का रेसिडेन्सी या अनधिकृत इमारतीचे बांधकाम नगररचना विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून दिनांक २०/०५/२०२५ ते दिनांक १३/०६/२०२५ च्या कालावधीत पूर्णपणे निष्कासीत केलेले आहे.

मौजे गोळवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं.६१/२/क, स.नं.६१/८/ह, स.नं.८०/२/ड, स.नं.८०/३/अ, स.नं.८०/५/ब, स.नं.८०/७/अ, स.नं.८०/८/अ, स.नं.८०/९/अ, स.नं.८०/९/ब या मिळकती सद्य:स्थितीत श्री.यशवंत भिमराव आंबडेकर यांचे वारस श्री.प्रकाश यशवंत आंबडेकर व इतर यांचे नावे दाखल असून, सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण झालेले नाही किंवा त्रयस्थ व्यक्तींची नावे दाखल झालेली नाहीत.

-----------------

## कुशिवली धरणासाठी (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) येथील भूसंपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(४) * ९३६४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रांत कार्यालयांतर्गत हाजीमलंग परिसरातील कुशिवली धरण क्षेत्रासाठी एकूण ८५.४० हेक्टर जमिनीचे संपादन करताना एकूण ५३ जमिनधारकांना ११ कोटी ५१ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीच्या भूसंपादनाचा मोबदला अधिकाऱ्यांच्या संगनमताने मूळ जमीन मालकांऐवजी त्यांच्या मर्जीतील व्यक्तींना बनावट कागदपत्रांद्वारे देऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या दोषींची पुन्हा सुटका झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तत्कालीन तलाठी, मंडलाधिकारी, नायब तहसीलदार व प्रांताधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) कुशिवली धरण क्षेत्रासाठी ८५.४० हे.आर क्षेत्रासाठी एकूण ७२ स.नं. करीता रु.१९,८४,११,९०५/- एवढ्या रक्कमेचा निवाडा घोषित करण्यात आला. तद्नंतर एकूण २५ स.नं. करीता रु.११,४४,०९,८९५/- एवढ्या रक्कमेचे वाटप करण्यात आले.

(२) कुशिवली धरण क्षेत्रासाठी एकूण ७२ सर्व्हे नं. साठी रु.१९.८४ कोटी एवढ्या रक्कमेचा निवाडा दिनांक २७.१२.२०२३ रोजी घोषीत करण्यात आला. सदर मोबदला वाटप करताना एकूण २३ सर्व्हे नंबरच्या खातेदारांऐवजी बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस इसमांद्वारे मोबदला रु.१०,१०,७७,१२०/- कोटी रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांनी मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे ०५ गुन्हे दाखल केले असुन त्यामध्ये ५१ आरोपींना अटक करण्यात आली. प्रकरणी लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार विशेष तपास पथकाची (SIT) स्थापन करण्यात आली. विशेष तपास पथकाच्या तपासाअंती गुन्हेगारी स्वरुपाचा सहभाग नसलेल्या लोकसेवकांविरुध्दचा तपास भारतीय दंड संहिता कलम १७३ (८) अन्वये बंद करण्यात आला आहे.

तसेच उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर येथे कार्यरत सेवानिवृत्त नायब तहसीलदार यांचा सहभाग असल्याने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली होती. तसेच अपहार रक्कम वसूलीसाठी त्यांच्या खाजगी मालमत्तेवर बोजा चढवुन वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

तपासाअंती उर्वरित आरोपी विरोधात मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. बनावट कागदपत्रांच्या अपहार केलेल्या रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांबागाव (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील आदिवासी लोकांच्या जमिनींचा भूमाफियांनी ताबा घेतल्याबाबत

**(५) * १३८४७ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबागाव (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील आदिवासी लोकांच्या ४६४ एकर जमिनीवर भूमाफियांनी बोगस शेतकरी प्रमाणपत्राच्या आधारे आदिवासी लोकांना त्यांच्याच जमिनीतून बेदखल केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९३२ पासून येथे आदिवासी लोक राहत असून प्रशासन याकडे दुर्लक्ष करुन भूमाफियांच्या बाजूने निर्णय घेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूमाफिया व संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक आदिवासी लोकांकडून करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित भूमाफिया व प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कांबा, ता.कल्याण येथील सर्व्हे नं.३५, ५२, ६४, ७७, १२५ बाबत तत्कालीन मामलतदार, कल्याण यांनी मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या कलम ३७ (२) मधील तरतूदीनुसार दिनांक २१ जानेवारी, १९६० रोजीच्या आदेशाद्वारे सदर मिळकती या शासकीय जमिनी म्हणून घोषित केल्या होत्या. सदर आदेशाविरूद्ध तत्कालीन मा.अति.सहायक न्यायाधीश, ठाणे यांनी दिनांक २९ जुलै, १९६८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी श्री.विष्णू लक्ष्मण फडके व इतर हे उक्त नमूद मिळकतींचे मालक असल्याचे घोषित करून सदर मिळकती या वैयक्तिक इनामे निर्मुलन अधिनियम, १९५३ च्या कलम ७ नुसार सरकारी जमिनी घोषित करण्याची कार्यवाही रद्द केली होती. तद्नंतर सदरचे मा.अति.सहायक न्यायाधिश, ठाणे यांचे आदेश मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८.०८.१९९८ च्या आदेशान्वये कायम करण्यात आले आहेत.

तद्नंतर फेरफार क्र.१८२६ व क्र.१८२७, दिनांक ०५.०४.२००६ नुसार सदर जमिनी ह्या खातेदार श्री.विष्णू लक्ष्मण फडके व इतर यांचेकडून श्री.चंद्रकांत शहा व इतर यांनी खरेदी केल्या होत्या. सदर व्यवहारामध्ये खरेदीदार हे शेतकरी दर्जा धारण करत नसल्याबाबत श्री.देवराम सुरोशे व इतर यांनी कुळ कायद्याच्या कलम ८४ क नुसार तहसीलदार, कल्याण यांचेकडे केलेला अर्ज व उप विभागीय अधिकारी, कल्याण यांचेकडे केलेल्या अपिलामध्ये खरेदीदार हे शेतकरी असल्याचे सिद्ध होत नसल्याने सदर जमिनीचे हस्तांतरण अग्राह्य घोषित करून अभिलेखात महाराष्ट्र शासनाचे नाव नोंदविण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर आदेशाविरूद्ध खरेदीदार यांनी मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे अपील केले असता मा.न्यायाधिकरणाने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे आदेश रद्द केले होते. सदर आदेशाविरुद्ध श्री.देवराम सुरोशे व इतर यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल केले असता मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९.०९.२०२४ च्या आदेशान्वये खरेदीदार व कुळ यांचेतील कन्सेंट टर्म्स स्विकारण्यास असहमती दर्शविली होती. उक्त आदेशाविरूद्ध खरेदीदार व कुळ यांनी दाखल केलेल्या अपिलामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०.१२.२०२४ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे दिनांक १९.०९.२०२४ रोजीचे आदेश रद्द करून दिनांक २३.०८.२०२४ रोजीच्या कन्सेंट टर्म्स मान्य केल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने तहसील कार्यालयाकडून दिनांक १८/०२/२०२५ रोजी मौजे कांबा, ता.कल्याण, जि.ठाणे येथील सर्वे क्रमांक ३५, ५२, ६४, ७७ आणि १२५ या मिळकतींच्या अधिकार अभिलेखातील महाराष्ट्र शासन हे नाव कमी करुन महाराष्ट्र शासन असे नाव अभिलिखित करण्यापूर्वीची नावे

अधिकार अभिलेखात पुन:स्थापित करण्यात यावीत, असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच सन १९३२ पासून आदिवासी लोक राहत असलेल्या जागेवर भूमाफियांच्या बाजूने निर्णय घेत असलेबाबत कोणतीही बाब तसेच सदर भूमाफिया व संबंधीत प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याबाबतची स्थानिक आदिवासी लोकांकडून मागणी करण्यात आल्याबाबत निदर्शनास आलेले नाही.

त्यामुळे शासनाने चौकशी करुन संबंधीत भूमाफिया व प्रशासकीय अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सदर प्रकरणी कोणताही विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड (जि.बीड) नगरपालिकेअंतर्गत विविध कामात झालेल्या अनियमिततेबाबत**

**(६) * १०७३८ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपालिकेंतर्गत सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून झालेल्या अनियमिततेबाबत असंख्य तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त झाल्या असून यापूर्वी देखील या विषयी विभागाकडे व शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून वेळोवेळी पत्रव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनियमितता होत असताना आरक्षित जागेचे खरेदी खत, बोगस गुंठेवारी करून शहरातील मोकळया जागेचे खरेदी खत, मंजूर लेआऊटमधील ओपन स्पेस आणि आरक्षित स्पेसचे झालेले बोगस खरेदी खत, नगरपालिका प्रशासन आणि संबंधित कार्यालय यांनी केलेले बोगस खरेदी खत, रेडीरेकनरमध्ये छेडछाड करून शासनाचा बुडविलेला महसूल यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ मे, २०२५ रोजी मा.महसूल मंत्री, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे चौकशी करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कार्यालयाकडून सातत्याने नागरिकांना व शेतकरी बांधवांना वेगवेगळया स्वरूपाची उत्तरे दिली जात असून त्यांच्या सर्व तक्रारीचे निरसन करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त कार्यालयातील अनियमितता व गैरव्यवहार रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, बीड यांचेबाबत कोणतीही तक्रार विभागाकडे प्राप्त झालेचे आढळून आलेले नाही.

तथापि, सह दुय्यम निबंधक बीड क्र.१ व बीड क्र.२ या कार्यालयाबाबत दस्त नोंदणीच्या अनुषंगाने तक्रारी संदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड, सह दुय्यम निबंधक बीड क्र.१ व सह दुय्यम निबंधक बीड क्र.२ यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

(३) हे खरे नाही.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१, बीड व त्यांच्या अधिपत्याखालील सह दुय्यम निबंधक, बीड क्र.१ व सह दुय्यम निबंधक बीड क्र.२ कार्यालयाकडून उत्तर दिली जातात.

(४) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक १७.०५.२०२५ रोजीच्या पत्रातील सर्वे नंबरच्या दस्तांची तपासणी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड यांनी केली असता कोणत्याही प्रकारचे बोगस खरेदीखत अथवा शासन महसूल बुडविला असल्याचे आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राणी व पक्ष्यांना कायमस्वरुपी नैसर्गिक तसेच कृत्रिमरित्या पाणी पुरवठा करण्याबाबत

**(७) * ७९७६ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पात नैसर्गिक पाणी व कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने वन्यप्राण्यांची होरपळ होऊन अनेक प्राणी व पक्ष्यांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील वन्यप्राणी व पक्षी यांना सौर ऊर्जेचा वापर करुन सिमेंट बशी व कृत्रिम पाणीपुरवठा योग्य प्रमाणात होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राणी व पक्षी यांना कायमस्वरुपी नैसर्गिक स्त्रोताद्वारे व कृत्रिम पध्दतीने पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक जलस्त्रोत तसेच कृत्रिम पाणवठे माहे एप्रिल, २०२५ मध्ये कोरडे पडल्यामुळे पाण्याअभावी वन्य प्राणी व पक्ष्यांचा होरपळ होऊन मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) वन्यप्राण्यांसाठी व पक्ष्यांना मुबलक पाणीसाठा उपलब्ध होण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

नैसर्गिक पाणवठे-५६१, कृत्रिम पाणवठे-४३२, सोलर पंप-२०२, सिमेंट बंधारे-२६९, मेळघाट बंधारे-१२३६, ॲनिकट बंधारे-१५ व माती बंधारे-६७ इत्यादी कामे करण्यात आली आहेत व ज्या ठिकाणी पाणीपातळी कमी झाली आहे अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

-----------------

## मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा येथे जाणाऱ्या अजंठा कंपनीच्या प्रवासी बोटीला छिद्र पडून प्रवाश्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याबाबत

**(८) * ८३६८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा येथे जाणाऱ्या सागरी मार्गावरील अजंठा कंपनीच्या कॅटमरॉन प्रवासी बोटीला छिद्र पडल्याने बोटीतील १३० प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या घटना यापूर्वी घडल्या असून त्यात जिवितहानी झाली असतानाही याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत मा.मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री यांनी आदेश दिल्यानंतर त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशी समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) त्रिसदस्यीय समितीच्या चौकशी अहवालानुसार, बोटीला छिद्र न पडता स्टेअरिंग रडर पाईपमधील तांत्रिक दोषामुळे ही घटना घडल्याचे निष्पन्न झाले आहे.

यापूर्वीच्या घटनांचा विचार करता, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवासी सुरक्षा उपाययोजनांची मार्गदर्शक तत्त्वे (Standard Operating Procedure) तयार करण्यात आली आहेत.

(३) होय.

(४) व (५) चौकशी समितीचा अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला असून, त्यानुसार सदरील बोटीचे नोंदणी प्रमाणपत्र, सर्व्हे प्रमाणपत्र व प्रवासी परवाना दिनांक १२.०४.२०२५ पासून निलंबित करण्यात आले असून संबंधितांवर रु.२५,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेततळ्यांच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी अनुदान मिळण्याबाबत

**(९) * १२७५७ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार व रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या शेततळयांमध्ये प्लॅस्टिक अस्तरीकरणाअभावी पाण्याचा साठा होत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सदर योजनेकरीता खर्च केलेल्या लाखो रुपयांच्या शासनाच्या निधीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेततळयांच्या अस्तरीकरणासाठी मिशन नंदादीप (मनरेगा) या महत्वाकांक्षी योजनेतून तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेकडे प्लॅस्टिक आच्छादनाकरीता अनुदान उपलब्ध करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदान उपलब्ध करुन सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) हे खरे नाही.

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या वैयक्तीक शेततळे या योजनेचा मुख्य उद्देश हा भूजल पुनर्भरण करणे व पिकांसाठी संरक्षित सिंचनाची सोय उपलब्ध करणे हा आहे. अस्तरीकरण विरहीत शेततळयांमुळे मोठ्या प्रमाणात भूजल पुनर्भरण होत असून पिकासाठी संरक्षित सिंचनाची सोय उपलब्ध होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे किंवा योजनेवरील खर्चाचे नुकसान होत आहे, असे म्हणणे संयुक्तीक होत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र - नागपूर अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये प्लॅस्टिकचे अस्तरीकरण केल्यानंतर पाणी साठवणूक पुरेशा प्रमाणात होत आहे.

(३) हे खरे नाही.

विक्रमगड तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र - नागपूर अंतर्गत ग्राम पंचायत स्तरावरून १४ शेततळे अस्तरीकरणाची कामे घेण्यात आली असून त्यापैकी १३ कामे पूर्ण झाली आहेत व १ काम प्रगतीपथावर आहे. तसेच १२ अर्ज प्राप्त झाले असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

पालघर जिल्ह्यातील सन २०२५-२६ मध्ये प्रगतीपथावरील कामांची संख्या १०७ असून ३ कामे पूर्ण झालेली आहेत.

सन २०२५-२६ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र - नागपूर व CSR च्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी १०X१०X३ आकारमानाचे शेततळे खोदकाम अस्तरीकरणासह राबविण्यात येत असून ८० शेततळ्यांना तालुकास्तरावरील कार्यालयाकडून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र - नागपूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र - नागपूर व CSR च्या माध्यमातून शेततळे खोदकाम अस्तरीकरणासह नियोजन (रोहयो) विभागाकडून राबविण्यात येते. तसेच बारमाही सिंचनाची सोय करण्यासाठी शेततळ्यांचे अस्तरीकरण करावयाचे आहे. त्यांना प्रामुख्याने राष्ट्रीय कृषी विकास योजना व एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम या योजनेतून सामूहिक शेततळ्यांकरिता अस्तरीकरणाचा लाभ देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, अंबरनाथ, कल्याण तसेच भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) शासकीय भूखंडावरील अनधिकृत बांधकामांबाबत

**(१०) *१२३३५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, अंबरनाथ, कल्याण तसेच कशेळी, भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील शासकीय भूखंडांवर ८९६ बेकायदा बांधकामे उभी राहिली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण तालुक्यात ३२७ व अंबरनाथ तालुक्यात ५५० बांधकामांचा समावेश असून सदर प्रकरणात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी नियमबाह्य काम केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकामांबाबत अनेक तक्रारी दाखल असून निष्कासनाची कार्यवाही करुनही उक्त बांधकामे पुन्हा उभारण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या कलम ५४ व कलम ५६ अ अन्वये विकासकांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषी विकासकांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) ठाणे जिल्ह्यातील ठाणे, अंबरनाथ व कल्याण तहसिल मधील एकूण ७० सहकारी गृहनिर्माण संस्थाना वाटप करण्यात आलेल्या २९१९ शासकीय भूखंडापैकी १६८९ भूखंडाबाबत शर्तभंग झाल्याचे आढळून आले होते. त्यानुषंगाने संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३/०४/२०१७ व दिनांक १५/०९/२०१८ मधील तरतुदीन्वये सदरचा शर्तभंग नियमनाकूल करण्याबाबत स्वारस्य दाखवून अर्ज केलेल्या ९१४ भूखंडाचे शर्तभंग नियमनाकूल करण्यात आलेले असून अद्याप ७७५ सोसायटी धारकांनी शर्तभंग नियमनाकूल करण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेले नाहीत. त्यानुषंगाने शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये ठाणे जिल्ह्यामधील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या शर्तभंग विषयक प्रकरणांमध्ये

करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने निर्देश/सूचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत. ठाणे जिल्ह्यामधील सहकारी गृहनिर्माण सोसायटींचे शर्तभंग नियमनाकूल करण्याबाबतच्या उक्त धोरणाची मुदत दिनांक १४/०३/२०२५ रोजी समाप्त झाल्यामुळे सदर धोरणास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच सदरची अनधिकृत बांधकामे ही शासकीय जमिनीवरील असल्यामुळे शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दिनांक ०७.०९.२०१० नुसार सदर बांधकामांवर कार्यवाही करण्याची बाब महसूल विभागाशी संबंधित असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, कल्याण डोंबिवली व ठाणे महानगरपालिका यांनी नमुद केले आहे. मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील स.नं.१९३ या शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामे तहसीलदार, भिवंडी यांचेकडून दिनांक १९/०१/२०१८ रोजी ११ पुर्णत: व १७ अंशत: निष्कासित करण्यात आली होती. सदर कार्यवाहीच्या विरुध्द दाखल आर.सी.एस नं.४४/२०१८ ते ६१/२०१८ हे दावे मा.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, ठाणे यांनी वादी यांना स्वारस्य नसल्यामुळे दिनांक ०३/०८/२०२४, दिनांक ०५/०९/२०२४, दिनांक २४/०१/२०२५ व दिनांक ०१/०२/२०२५ रोजी निकाली काढले आहेत.

मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील स.नं.१९३ येथील शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक ०१/०१/२०२४ रोजी बांधकामे निष्कासित करणेबाबत आदेश पारीत केले आहेत. त्यानुषंगाने उप अधीक्षक, भूमी अभिलेख, भिवंडी यांनी सादर केलेल्या मोजणी नकाशानुसार तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक १२/०६/२०२५ रोजी मौजे कशेळी, ता.भिवंडी येथील शासकीय स.नं.१९३ वर पूर्णत: व अंशत: झालेल्या अनधिकृत बांधकामाचे क्षेत्र निश्चित करुन बांधकामधारकांची यादी तयार करण्यासाठी पथक गठीत केले असून सदर पथकाचा अहवाल प्राप्त होताच उक्त अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**ठाणे व मीरा-भाईंदरमध्ये विनापरवानगी नवीन बांधकामे सुरु असल्याबाबत**

**(११) * ९५९३ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व मीरा-भाईदरमध्ये परवानगी न घेता अनेक नवीन बांधकामे सुरु असून अधिकाऱ्यांकडून जुन्या कामांना नोटीसा दिल्या जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी एकच फेरफार असणाऱ्या मिळकतदारांकडून स्वामित्वधनाची रक्कम एकत्रित वसूल केली जात असल्यामुळे यासंदर्भात त्वरित कारवाई करावी व सरकारी जमिनीवर फलक लावून त्या ताब्यात घेऊन दोषींवर तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना मा.महसूल मंत्री महोदयांनी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारी तातडीने निकाली काढण्यासाठी लोक अदालतीद्वारे प्रकरणे निकालात काढण्याच्या सूचनाही मा.मंत्री महोदयांनी दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन स्वामित्वधन रक्कम वसूलीसंदर्भात व अनधिकृत बांधकामांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

नव्याने आढळून येणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर ठाणे महानगरपालिका व मीरा-भाईंदर महानगरपालिकांकडून नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सरकारी जमिनीवर फलक लावणेबाबत क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे तसेच स्वामित्वधनाची रक्कम एकत्रित वसूल केले जात असलेबाबत निवेदन अथवा अर्ज प्राप्त न झाल्याने स्वामित्वधन वसूल करण्याबाबतची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी कळविले आहे.

(३) खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा पूर्ण लाभ मिळाला नसल्याबाबत

**(१२) * ७०८४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (वैजापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांनी पिक विम्यांचे हफ्ते भरुनही दोन वर्षांपासून त्यांना पिक विम्याचा पूर्ण लाभ मिळत नसल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पंतप्रधान पिक विमा योजनेत बदल केल्यामुळे पिक विम्याच्या अर्जामध्ये दुप्पटीने वाढ होऊन तसेच बनावट अर्ज करुन पिक विम्याचे पैसे बळकाविल्याचा प्रकारही निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमुळे राज्य शासनावरील आर्थिक भार वाढल्याने एक रुपयात पिक विमा योजना रद्द करुन पूर्वीच्या पंतप्रधान पिक विमा योजनेची राज्यात अंमलबजावणी सुरु करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात शासनाने पंतप्रधान पिक विमा योजनेत बदल करुन सुरु केलेल्या एक रुपया पिक विमा योजनेत सन २०२३-२४ या वर्षांत कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याने नांदेड, परभणी, बीड, जालना या आदी जिल्ह्यातील अधीक्षक, कृषी अधिकारी, सर्व तालुका अधिकारी व विमा कंपन्यांचे अधिकारी यांना पिक विमा गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा संपूर्ण लाभ मिळण्याबाबत तसेच विमा कंपन्यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०२३ च्या खरीप हंगामापासून शेतकऱ्यांकडून केवळ रु.१ एवढे शुल्क घेवून, सर्वसमावेशक पिक विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळे खरीप हंगामात अर्जसंख्या ही दुप्पटीने, तर रब्बी हंगामात अर्जसंख्या १० पटीने वाढल्याचे निदर्शनास आले. तसेच, बनावट/गैरप्रकारे अर्ज करण्यात आल्याचे निदर्शनास आले. परिणामी राज्य शासनाच्या आर्थिक भारात गत वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली.

या पार्श्वभूमीवर सदर पिक विमा योजनेत बदल करून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, खरीपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेवून, उर्वरीत पिक विमा हप्ता हा केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत देऊन, पिक कापणी प्रयोगांवर आधारित, सुधारित पिक विमा योजना खरीप, २०२५ पासून राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.
(४) व (५) प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्या अर्जदारांचे विमा अर्ज रद्द करुन, त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात, क्षेत्रीय यंत्रणा तसेच, संबंधित पिक विमा कंपन्यांना कृषि आयुक्तालयाकडून निर्देश देण्यात आले आहेत. याअंतर्गत विमा अर्जांची तपासणी करून, अपात्र अर्ज रद्दबातल ठरविण्यात आले आहेत. तसेच, अयोग्य विमा अर्जांची नोंदणी करणाऱ्या सामूहिक सुविधा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर काही सामूहिक सुविधा केंद्रांच्या विरोधात पोलीस स्थानकात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या खेरीज खरीप हंगाम, २०२५ पासून पिक कापणी प्रयोगावर आधारित सुधारित पिक विमा योजना राबविण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## गोसेवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) येथे माती उत्खनन होत असल्याबाबत

**(१३) * ११९२३ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील शेत शिवारात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या माती उत्खनन होऊन वाहतूक सुरु असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त माती उत्खननामुळे तसेच अवैध गौण खनिजाच्या उत्खननामुळे जंगले, झाडेझुडपे नामशेष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविला जात असून याबाबत महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) गोसेवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील शेत शिवारात नियम धाब्यावर बसवुन मोठ्या प्रमाणात अवैधरित्या माती उत्खनन तसेच वाहतूक सुरु असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) माती उत्खननामुळे अवैध गौण खनिजाच्या लुटीमुळे जंगले, झाडेझुडपे नामशेष होत असल्याचेही निदर्शनास आलेले नाही. तसेच, लाखो रुपयांचा महसूल बुडविला जात असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, तक्रारी प्राप्त नसल्यामुळे चौकशीचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात जंगलात वणवे लागल्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१४) * ७६३१ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात जंगलामध्ये वणवे लागल्याच्या एक हजाराहून अधिक घटनांची नोंद दिनांक १ जानेवारी, व ७ एप्रिल, २०२५ या कालावधीत झाल्याचे भारतीय वन सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीतून दिनांक १८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगलांना लागणाऱ्या सततच्या आगींमुळे वन्यप्राण्यांचे मृत्यू होऊन वनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून जैवविविधतेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्ह्यातील तळजाई टेकडी क्षेत्रात आगी लागण्याच्या घटना वारंवार घडत असून साईनाथनगर येथे

दीड हेक्टर परिसरात आग पसरुन शेकडो देशी वृक्षांची हानी झाली असून सदर आग नैसर्गिक कारणाने लागली नसल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण या विभागातील वनपट्टयांमध्ये वारंवार वणवे लागून वनसंपदा नष्ट झाल्याच्या घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जंगल क्षेत्रात सातत्याने लागणारी आग विझविण्यासाठी वन विभागाकडे पारंपारिक साधनाव्यतिरिक्त इतर साधने नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांमुळे जंगलात आग लागण्याच्या घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) राज्यातील अनेक जिल्ह्यातील वनक्षेत्रात दिनांक ०१ जानेवारी व १५ एप्रिल, २०२५ या कालावधीत एकूण आगींच्या घटनांची संख्या २०४ असल्याचे निदर्शनास आले आहे.

जंगलांना लागणाऱ्या आगी प्रामुख्याने भूपृष्ठीय असल्याने गवत, पालापाचोळा नष्ट झाल्याचे आढळून आले आहे. परंतु सदर आगींमध्ये वन्यजीवांचे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) सदर प्रकरणी दिनांक ०८.०३.२०२५ रोजी साईनाथ नगर बाजूला वनक्षेत्रात वणवा लागला असुन वणवा लागताच त्याबाबत वनगुन्हा नोंदविण्यात आला असुन आरोपी जागेवर मिळून आला नाही. सदर वनगुन्ह्यांची चौकशी केली असता सदरचा वणवा अज्ञात इसमांच्या हलगर्जीपणामुळे लागल्याची शक्यता आहे. भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये वनरक्षक पाचगाव पर्वती, वनपरिक्षेत्र भांबुर्डा यांनी वनगुन्हा नोंद केला आहे.

(४) ठाणे वनविभागातील मुरबाड, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण या वनपट्टयांमध्ये वारंवार वणवे लागून वनसंपदा नष्ट झाल्याच्या घटना घडलेल्या नाहीत. परंतु माहे जानेवारी, २०२५ मध्ये ठाणे वनविभागात ८ आगीच्या घटना घडल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(५) व (६) वनक्षेत्रात वणवा लागताच त्याबाबत वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. वनक्षेत्रात करण्यात येणाऱ्या अवैध बाबींबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ नुसार कार्यवाही करण्यात येते. वनक्षेत्रात वनवणवा लागू नये म्हणून वनक्षेत्राभोवती जाळपट्टे घेण्यात आले आहेत. तसेच वणवा विझणेकामी Fire Fighting Equipment चा वापर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वनवणवा प्रतिबंधक चमू नेमण्यात आला असून त्यांचेकडून त्वरीत वणवा विझविण्याचे काम केले आहे.

-----------------

## राज्यात शासनाच्या एचटीबीटी बियाण्यांच्या विक्री प्रकरणात शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक

**(१५) * ८५२३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुरेश धस (आष्टी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाची एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीसाठी तेलंगणा, गुजरात, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेशातील एजंट अमरावती जिल्ह्याच्या सिमावर्ती भागात सक्रीय झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात धामणगांव, यवतमाळ मधील बाभुळगांव व वर्धा जिल्ह्यातील पुलगाव या तीन

जिल्ह्यांच्या सिमांच्या त्रिकोणामध्ये तर मध्यप्रदेश सिमेलगत वरुड तालुक्यात दरवर्षी एचटीबीटी बियाणांची विक्री होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात जनुकीय बदल करुन एका विशिष्ट तणनाशक वापराला पोषक वातावरण निर्माण होऊन कापूस बियाणामुळे तणनाशकाचा वापर वाढून पर्यावरणाचे नुकसान होत असून माणसे कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला बळी पडत असल्यामुळे जिवितहानी होत असल्याने सदर बियाणांवर केंद्र शासनाने बंदी घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीटी, एचटीबीटी नावाने गुजरात राज्यातून या बियाणांचा महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील कापूस उत्पादक जिल्ह्यात बेकायदेशीर पुरवठा होत असून एचटीबीटी तपासणीसाठी सर्व कंपन्यांचे नमुने घेतले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बियाणांच्या कंपन्यांपैकी अंकुर, अजित, राशी, निजुविडू यासारख्या कंपन्याच्या मालासारखीच बियाणे विकणाऱ्या कंपन्याचा गैरव्यवहार रोखण्यास कृषी खात्यातील गुणनियंत्रण यंत्रणा दुर्लक्ष करीत असून कंपन्यांविरुद्ध कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन एचटीबीटी बियाण्यांच्या विक्री प्रकरणात शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टाळण्याच्या दृष्टीने तसेच मागील दहा वर्षात गुणनियंत्रण विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच कापसाचे बनावट बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) भरारी पथकाच्या तसेच गुण नियंत्रण निरिक्षकांच्या माहे एप्रिल, २०२५ मधील तपासणी मोहिमेदरम्यान अशा प्रकारची बाब निदर्शनास आली नाही.

(२) धामणगाव व वरुड येथे एचटीबीटी बियाण्यांची विक्री होत असल्याचे आढळून आले.

(३) एचटीबीटी बियाणाच्या विक्रीसाठी केंद्र शासनाकडून अद्याप मान्यता देण्यात आली नाही.

(४) हे खरे नाही. कृषी आयुक्तालयाकडून केलेल्या कार्यवाहीमध्ये आढळून आलेल्या एचटीबीटी बियाण्याचे सर्व नमुने विश्लेषणाकरिता प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले आहेत.

(५) हे खरे नाही.

(६) अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणेसह कृषी निविष्ठामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यास्तव शेतकऱ्यांसाठी विविध प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात येऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, हाताळणी व विक्री यामध्ये सहभाग असलेल्या व्यक्ती विरोधात बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८ व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये कार्यवाही करण्यात आली असून राज्यात अनधिकृत एच.टी.बी.टी. बियाणे विक्रीबाबत एकूण ५३ पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या. त्याद्वारे जप्त बियाण्याची १२,८४३ बंद पाकीटे व २८५३.७० किलो खुले बियाणे जप्त करण्यात आले असून त्याचे मुल्य एकूण २१६.०२ लाख इतके आहे. या सर्व प्रकरणी पुढील तपासाची कार्यवाही पोलीस यंत्रणेमार्फत सुरु आहे.

-----------------

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथील सरकारी गायरान जमिनीवर खाजगी व्यक्तीचे अतिक्रमण होत असल्याबाबत

**(१६) * ११८२९ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) शहरातील सर्व्हे क्र.१४९/१९ मधील कोट्यवधी रुपये किंमतीच्या सरकारी गायरान

जमिनीवर खाजगी व्यक्तीकडून अतिक्रमण करून जागा बळकाविण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील जागा शासकीय वापरांकरिता शिल्लक रहावी व सदरहू जागेवर शासकीय कार्यालये उभी रहावीत यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक सामाजिक संघटनांनी सदर जागा नगरपरिषदेला विविध बांधकामांसाठी हस्तांतरित करावी यासाठी मा.महसूल मंत्री व जिल्हाधिकारी (चंद्रपूर) यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२३ व सन २०२४ मध्ये निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्यास विभागीय आयुक्तांसह स्थानिक प्रशासनाकडून दिरंगाई होत असून उक्त जागा शासकीय वापरांकरिता न देता खाजगी व्यक्तीला दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण तात्काळ हटविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत केलेली नियमबाह्य खरेदी

**(१७)** * **१२८९३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक कापूस, सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजनेत सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या मागर्दर्शक सूचना आणि तज्ञ शास्त्रज्ञ यांची मान्यता नसतानाही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत सुमारे रु.२६४ कोटी रुपयांची आणि DBT धोरणाच्या शासन निर्णयाचे उल्लंघन करून सुमारे रु.७७ कोटी रुपयांची नियमबाह्यरित्या खरेदी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी प्रक्रियेत कंत्राटदार, संबंधित विभाग तसेच तत्कालीन मंत्री आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने नियमबाह्य पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या असून सदर प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये, कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत थेट लाभ हस्तांतर (DBT) बाबत एक वेळची विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांना वस्तू स्वरूपात लाभ देण्यास मंजूरी देण्यात आली होती.

(२) कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर निविष्ठा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित (MAIDC) व महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ (MSPC) यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रक्रियेबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, मा.लोकायुक्त यांचेकडे सुद्धा सदर प्रकरणावर कार्यवाही सुरू आहे.

तसेच, मा.राज्यमंत्री (कृषि) यांनी प्र.स. (कृषि) यांना प्राप्त तक्रारीबाबत बैठक घेऊन त्यात या प्रकरणी अहवाल सादर करण्याचे सूचित केले आहे. त्यानुसार प्रधान सचिव (कृषि) यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

-----------------

## भोगाव साबळे (ता.जि.परभणी) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाच्या निधीचा केलेला अपहार

**(१८) * ७९२१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोगाव साबळे (ता.जि.परभणी) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतजमिनीवर विहिर खोदकाम प्रकरणामध्ये निधीचा अपहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात विहीर न खोदता ग्रामसेवक, रोजगार सेवक, अभियंता व इतर संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे रु.५८,९६८ रुपयांचा अपहार केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासकीय निधीची वसूली करण्यासह यातील संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संबंधित ग्रामरोजगार सेवक यांच्याकडून रू.५८,९६८/- वसूल करण्यात आलेले आहेत. तसेच संबंधित ग्रामरोजगार सेवक व तांत्रिक सहायक यांना तात्काळ सेवेतून कमी करण्याबाबत आयुक्त, (मनरेगा) नागपूर यांच्याकडून जिल्हाधिकारी, परभणी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोदा (जि.नंदुरबार) प्रकल्पातून लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या साहित्याबाबत

**(१९)** * **१०९१८ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोदा (जि.नंदुरबार) प्रकल्पातून लाभार्थ्यांना देण्यात आलेले न्युक्लिअस बजेट अंतर्गत शेळया, दुधाळ जनावरे, भजनी साहित्य, क्रिकेट साहित्य व भांडी संच इ. साहित्य तसेच शबरी घरकुल योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे साहित्याचे वाटप करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकुवा व धडगाव येथे अनुक्रमे दिनांक ८ मे, व ८ जून, २०२५ रोजी झालेल्या आमसभेत आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी उक्त वाटप झालेल्या साहित्याची माहिती मागितली असता अधिकाऱ्यांनी माहितीच दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे साहित्य वाटप करणारे कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अक्कलकुवा येथे दिनांक १६ एप्रिल, २०२५ व धडगांव येथे दिनांक ८ मे, २०२५ रोजी झालेल्या आमसभेत विचारणा केलेली माहिती सभेदरम्यान व सभा संपल्यानंतर त्यांच दिवशी तळोदा प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(२०)** * **७४८४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे एकसाल सागाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) या ठिकाणी सन २०१५ मध्ये पुनर्वसन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण १२० प्रकल्पग्रस्त खातेदारांचे २४२ हेक्टर जागेत अर्धवट पुनर्वसन झाले असून ज्या १८ नागरी सुविधा देण्याचे आश्वासन दिले होते त्यापैकी बहुतांश सुविधा मिळाल्या नसून त्या जागेवर अतिक्रमण झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या क्षेत्रात पूर्वीपासून आदिवासींचे अतिक्रमण असून त्यांना वारंवार आदिवासींच्या संघर्षाला सामोरे जावे लागत असून पुनर्वसित गावठाणामध्ये विजेची व्यवस्था, रस्ते व शेतीसाठी पाणी नसणे तसेच पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागणे, रेशन न मिळणे त्याचप्रमाणे पावसाळ्यात जमीन खचत असल्याचेही प्रकल्पग्रस्तांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी १८ वर्षांवरील मुला-मुलींना पुनर्वसन लाभ देणे, तांबी व वासोटा गावासह प्रत्येक गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर करावी व देवस्थान, इनाम जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, अशा मागण्यांही केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील मौजे-रवंदी, आडोसी, माडोसी, कुसापूर व खिरखिंडी या पाच गावांतील ७० कुटुंबांचे ठाणे वन विभागातील पडघा वनक्षेत्रात मौजे एकसाल सागाव, ता.भिवंडी, जि.ठाणे या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले आहे.
(२) (३), (४), (५) व (६) एकूण २४२.३९ हेक्टर क्षेत्र वनेत्तर कामास उपलब्ध झालेले असले तरी वनहक्क दावे, स्थानिकांनी केलेले अतिक्रमण इत्यादींचा विचार करता जास्तीत जास्त १२१.१० हेक्टर वनक्षेत्र पुनर्वसनासाठी उपलब्ध झालेले आहे.

मौजे एकसाल सागाव, ता.भिवंडी येथे पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना ग्रामपंचायत कार्यालय, स्वच्छतागृह, समाजमंदिर, बसस्थानक, विद्युतीकरण, नळपाणी पुरवठा योजना, शाळेची इमारत बांधणे, साकव बांधणे, पोहोच रस्ता, देय जमीन शेती योग्य करणेसाठी मृद संधारण, रास्त धान्य दुकान, अंतर्गत रस्ते, गटारे इत्यादी १८ नागरी सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्त, कोयना पाचगाव ग्रामस्थ यांनी त्यांना असलेल्या अडीअडचणींबाबत उप वनसंरक्षक (प्रा.), ठाणे कार्यालयात दिनांक २०.०५.२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये त्यांच्या समस्यांसंदर्भात निवेदन दिले आहे. त्यानुसार जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचे स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मौजे पन्हाळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील एका रहिवाशानी शासकीय निधीचा केलेला अपहार

**(२१) * १२२७४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पन्हाळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील गावातील श्री.राजेंद्र कृष्णा चिके यांनी राजापूर प्रांत कार्यालयात सर्व्हे नं.२९५/३ मध्ये त्यांची ३ गुंठे जागा असताना जमिनीचा बनावट सातबारा जोडून सदरहू जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ मध्ये जात असल्याचे कागदोपत्री दाखविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय जागेचे ६ लाख ८१ हजार रुपये तर तीन गुंठे जमिनीमध्ये एकही हापूस आंबा झाड नसताना हापूस आंब्याचे झाड दाखवून २ लाख ३३ हजार तर स्टॉलचे ९९ हजार रुपये असे मिळून शासनाकडून १० लाख १३ हजार रुपये शासकीय निधी बळकावून आर्थिक गैरव्यवहार केल्या प्रकरणी श्री.रामचंद्र नारायण सरवणकर यांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी व प्रांत अधिकारी यांना लेखी तक्रार अर्ज करुनही अद्याप सदरहू प्रकरणी कोणतीच कारवाई केली नसल्याचे दिनांक १२ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) मौजे पन्हाळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या गावातील स.नं.२९५/३ मधील क्षेत्र ०.०१.२५ हे आर चौ.मी ही राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ मध्ये भूसंपादीत करण्यात आले. त्यामुळे ७/१२ मालक सदरी श्री.राजेंद्र कृष्णा चिके हे असल्याने सदर जमीन व त्यामधील वन झाड, फळझाडे व बांधकाम इत्यादींचा

एकूण मोबदला रु.६,८१,००३/- इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात आली.

तक्रारदार श्री.रामचंद्र नारायण सरवणकर यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विरार-भिवंडी ते अलिबाग महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) *१०७६२ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) विरार-भिवंडी ते अलिबाग हा १२६ कि.मी. अंतराचा मल्टीमॉडल कॉरिडोर सुमारे ६ ते १४ पदरी असून रायगड, ठाणे व पालघर अशा तीन जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख महामार्ग असणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्ग भिवंडी तालुक्यातील अलीमघर, हायवेदिवा काल्हेर, कशेळी केवणीदिवा खारबाव व खर्डी या गावातून जात असल्याने या महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला अद्याप देण्यात आलेला नाही तसेच रस्त्याच्या कामासंदर्भात कोणतीही माहिती अद्यापही देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त महामार्गाचे काम प्रलंबित राहण्याची तसेच शेतकऱ्यांच्या संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विरार ते अलिबाग महामार्गाच्या भूसंपादनासाठी उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १५ (२) ची अधिसूचना दिनांक १२.०८.२०२२ रोजी व कलम १८ (१) ची अधिसूचना दिनांक १०.०८.२०२३ रोजी महाराष्ट्र राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

(३), (४) व (५) विरार-भिवंडी ते अलिबाग या महामार्गाकरिता भूसंपादनाची कार्यवाही सुरु असुन काही ठिकाणी निवाडा अंतिम करुन निधी उपलब्धतेप्रमाणे निधीचे वाटप करण्यात आले आहे. निधी अभावी उर्वरीत प्रकरणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून निधी उपलब्ध करुन निधी वाटप करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्याचे तहसीलदार यांनी इनाम जमीन व गौण खनिज उत्खनन वाहतूकीमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(२३) * ११६९० श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्याचे तहसीलदार श्री.रमेश मुंडलोड यांनी इनाम जमीन व गौण खनिज उत्खनन व त्यांच्या वाहतूकीमध्ये कमी दंड घेऊन एकूण ७५ प्रकरणांमध्ये ४ कोटी ८७ लाख ९ हजार ३०० रुपयांचा शासनाचा महसूल बुडविला असल्याचे दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या तक्रारीनंतर विभागीय आयुक्त यांनी समिती गठीत केली होती त्या समितीने यासंदर्भातील अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.रमेश मुंडलोड, तत्का.अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांच्याविरुध्द तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी अपर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीच्या चौकशी अहवालानुसार श्री.मुंडलोड यांनी अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये शासनाचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त चौकशी अहवालास अनुसरुन श्री.मुंडलोड यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने मुंडलोड यांच्याविरुध्द शासन ज्ञापन दिनांक १०.०७.२०२४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे इनाम जमिनीबाबतच्या अनियमितता प्रकरणी विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक २७ जून, २०२५ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्तांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२) होय, खरे आहे.

श्री.रमेश मुंडलोड, तत्का.अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांच्याविरुध्द अवैध गौण खनिज उत्खनन व वाहूतक संदर्भात तक्रारींच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा दिनांक ११.०३.२०२२ रोजीचा चौकशी अहवाल विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १३.१०.२०२३ रोजीच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावासोबत शासनास सादर केला आहे.

(३) अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक अनियमितता प्रकरणी श्री.रमेश मुंडलोड, तत्का.अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांच्याविरुध्द शासन ज्ञापन दिनांक १०.०७.२०२४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच इनाम जमीन व गौण खनिज उत्खनन वाहतूकीमध्ये केलेल्या गैरव्यवहाराबाबत विभागीय चौकशीच्या अधिन राहून शासन आदेश दिनांक २६.०६.२०२५ अन्वये श्री.रमेश मुंडलोड, तत्का.अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गोंधळपाड्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(२४) * १२८५७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी**

**(दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गोंधळपाड्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे सामाजिक न्याय भवन धोकादायक झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ ते २०१४ मध्ये बांधलेल्या वास्तुसाठी ७ कोटी ३६ लाख १६ हजार रूपये खर्च करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये सदर वास्तुचे उद्घाटन झाल्यानंतर अवघ्या चार वर्षातच इमारतीच्या स्लॅबला तडे पडून स्लॅब कोसळू लागला असून भिंतींना भेगा पडल्यामुळे इमारत देखील धोकादायक बनली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले असून स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये इमारत धोकादायक असल्याचेही नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या केलेल्या बांधकामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

सामाजिक न्याय भवन धोकादायक झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

ही रक्कम मंजूर झाली होती. परंतु, जागा अपूरी असल्यामुळे रू.२७३.९४ लक्ष इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

(३) हे खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकारी यांच्या निष्काळजीपणा व निकृष्ठ दर्जाच्या बांधकामामुळे सदर वास्तुचे उद्घाटन झाल्यानंतर चार वर्षाच्या कालावधीत इमारतीच्या स्लॅबला तडे पडून स्लॅब कोसळू लागला. तसेच, भिंतींना भेगा पडल्यामुळे इमारत देखील धोकादायक बनली आहे.

(४) हे खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रायगड या इमारतीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड यांचेमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून त्यांनी दिनांक १०/०६/२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालात सदर इमारतीमध्ये काम करणे धोकादायक असल्याचे नमूद केले आहे.

(५) व (६) इमारतीचे बांधकाम अल्पावधीत धोकादायक होण्यास जबाबदार सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालीन उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याबाबत व ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत अधीक्षक अभियंता, सा.बां.वि. कोकण भवन यांना कळविण्यात आले होते. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधितांविरुद्ध कुठलीही कारवाई न केल्याने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड यांनी दिनांक १८/०७/२०२३ रोजी संबंधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळून "फार्मर आयडी" (अ‍ॅग्री स्टॅक) नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(२५) * १००१२ श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या विविध योजनांचा तसेच केंद्र शासनाने पंतप्रधान किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी "फार्मर आयडी" (अ‍ॅग्री स्टॅक) काढणे अनिवार्य केले असून सदर फार्मर आयडी काढण्याकरिता दिनांक ३१ मे, २०२५ रोजी ही अंतिम मुदत देण्यात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांची शेती, पिके, भू-संदर्भ व इतर कृषीविषयक माहिती डिजिटल स्वरुपात संकलित केली जात असून कृषी, महसूल व ग्रामविकास विभागातील कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्यातील समन्वयाअभावी नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्य शासनाने शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर तूर, मूग, उडीद, सोयाबीन, बाजरी व मका बियाणे मोफत देण्याचा निर्णय जाहीर केला असून जे शेतकरी पात्र व ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढला आहे त्यांना महा-डीबीटी या संकेतस्थळावर मोफत बियाणे योजना सुरु केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ऑनलाईन योजनेच्या फायद्यासाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे, मात्र नोंदणी करताना तांत्रिक कारणांमुळे पोर्टलवर अडचणी आल्याने शेतकऱ्यांनी या योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यामुळे जोपर्यंत तांत्रिक अडचणी व दोष पूर्णपणे कमी होत नाहीत तोपर्यंत फार्मर आयडी ही बाब अनिवार्य करण्यात येऊ नये, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांकडे दिनांक ३ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शासनाच्या विविध योजना व केंद्र शासनाच्या पंतप्रधान किसान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत तसेच "फार्मर आयडी" (अ‍ॅग्रीस्टॅक) नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अ‍ॅड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) खरीप २०२५ मध्ये सोयाबीन व भुईमूग पिकांचे ५ वर्षातील वाणांच्या प्रमाणित बियाण्यांचे वितरण १०० टक्के अनुदानावर करण्यात येत आहे. याकरिता लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर करण्यात येत आहे. तूर, मूग, उडीद, बाजरी व मका पिकांच्या वाणांच्या प्रमाणित बियाण्यांचे विहित अनुदान वाटप करण्यात येत आहे. याकरीता शेतकऱ्यांना बियाणे पुरवठादार संस्थांच्या वितरकांकडून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर बियाणे वाटप करण्यात येत आहे. सन २०२५-२६ पासून कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे फार्मर आयडी असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

अशा प्रकारचे कोणतेही निवेदन आढळून आले नाही.

(५) हे खरे आहे.

यासंदर्भात शेतकरी नोंदणी आणि शेतकरी ओळखपत्र तयार करण्यासंदर्भातील कार्यवाहीच्या अनुषंगाने

अडथळे दूर करणे, शेतकरी ओळखपत्र निर्मितीची गती वाढविणे, तसेच शेतकरी ओळखपत्र निर्मितीची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी याबाबत जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे आणि आयुक्त, (कृषि) कृषि आयुक्तालय, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना शेतकरी संचमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी व शेतकरी ओळख क्रमांक निर्मिती तातडीने पूर्ण करून घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंगीज (ता.दापोली-मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील खैर झाडांची अवैध तोड सुरु असल्याबाबत**

**(२६) * ११०८३ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंगीज (ता.दापोली-मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील खैर झाडांची अवैधरित्या तोड सुरु असल्याची तक्रार तेथील रहिवाशांनी तसेच श्री.संजय गुजर या वकिलांनी विभागीय वन अधिकारी-चिपळूण यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे टांगर, शिरसोली, आवाशी, सोवेली, पालगड व विसापूर (ता.दापोली) येथील खैराचे काटे जप्त करावेत, तसेच राखीव वनातील मौल्यवान खैर जातीच्या झाडांची मोठ्या प्रमाणात चोरी होत असून ती तात्काळ थांबविण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) ॲड.संजय गुजर यांनी दिनांक ०५.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) यांचे कार्यालयास तक्रार नोंदविलेली होती. त्यानुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) दापोली यांना दिनांक २३/१२/२०२४ रोजी चौकशीकामी कळविण्यात आलेले आहे.
(२) मौजे टांगर, शिरसोली, आवाशी, सोवेली, पालगड व विसापुर (ता.दापोली) या गावांमध्ये राखीव वनक्षेत्र नाही.
ॲड. गुजर यांचे सदर तक्रार अर्जाच्या अनुषगांने वनपरिक्षेत्र अधिकारी दापोली यांनी मौजे टांगर, शिरसोली, आवाशी, सोवेली, पालगड व विसापुर (ता.दापोली) येथील खैर खरेदी विक्रीकरीता लावण्यात आलेल्या खैर काटे धारकांची चौकशी केली असता, चौकशी दरम्यान सदर ठिकाणी खैराची अवैधरित्या खरेदी विक्री तसेच अवैध खैराचे काटे असल्याचे आढळुन आले नाही.
(३) व (४) वरील नमुद गावांमध्ये खैराच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वनगुन्हे नोंद केलेले आहेत :-
१) मौजे सडवली, पालगड, सोवेली, टेटवली, वेळवी ता.दापोली येथे एकूण ०५ ठिकाणी अवैधरित्या नापरवाना खैर उत्पादित लाकूड मालाची वाहतूक करून, साठा केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी दापोली यांनी विनापरवाना वाहतूकीचा खैर किटा १३.८८० घ.मी. लाकूड माल जप्त करून, संबंधित दोषी इसमाविरुध्द भारतीय वन अधिनयम, १९२७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
२) मौजे शिरसोली, टाळसुरे, फणसु, म्हाळुंगे (ता.दापोली) येथे मालकीक्षेत्रामध्ये एकूण-५७ खैर इ. झाडांची विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी वृक्षअधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी दापोली यांनी विनापरवाना वृक्षतोडीपासून उत्पादित केलेला लाकूड माल जप्त करून, वृक्षतोडीस जबाबदार आरोपी यांचेवर महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे.

-----------------

**शेगाव व पंढरपूर या पालखी दिंडी मार्गाचे काम करणाऱ्या मे.मेघा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने विनापरवाना गौण खनिजाचे केलेले उत्खनन**

**(२७) * १३६८४ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव व पंढरपूर या पालखी दिंडी मार्गाचे काम (कंत्राट) मे.मेघा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्याकडे दिले असून जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयाने या कंपनीला मुरूम वाळू व दगड चोरी प्रकरणी दोषी ठरवून सुमारे ५१.७० कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीमार्फत शासकीय स्तरावर संपर्क करून ५१.७० कोटी रुपयांच्या वसूलीसंदर्भात स्थगिती देण्याचे आदेश मिळविले व अपेक्षित दंडात्मक रक्कमेऐवजी १ % प्रमाणे केवळ रुपये ५ लाख १७ हजार इतकी दंडाची रक्कम भरण्यास मंजुरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण दंडात्मक रक्कमेच्या १ % इतकी रक्कम शासनजमा करण्याचा आदेश कंपनीला देण्यात आला असून तहसीलदार, परतूर यांनी सक्तीच्या वसूलीप्रित्यर्थ जप्त केलेले मे.मेघा इंजिनिअरिंग कंपनीचे साहित्य परत देण्याची कार्यवाही करावी, असेही आदेशात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त कंपनीने विना परवाना गौण खनिजाचे उत्खनन करुन शासनाचा महसूल बुडविल्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) शेगाव व पंढरपूर या पालखी दिंडी मार्गाने काम करणाऱ्या मे.मेघा इंजिनिअरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लि.हैद्राबाद यांनी गौण खनिजाचे अवैध उत्खननाच्या विविध प्रकरणात अपर जिल्हाधिकारी, जालना यांनी रु.३८,७०,०५,५२०/- व तहसीलदार, परतूर यांनी रु.५५,९८,५५,६००/- एवढ्या रकमेच्या दंडाचे विविध आदेश पारित केले आहेत.
(२) तहसीलदार, परतूर यांनी विविध प्रकरणी दिलेल्या आदेशाविरुध्द अपर विभागीय आयुक्त क्र.१ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दाखल केलेले अपिल फेटाळण्यात आल्यानंतर त्याविरुध्द मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे दाखल अपिल प्रकरणी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दंडात्मक रकमेच्य १ % प्रमाणे रु.१७,२८,४९८/- एवढी रक्कम शासन जमा केली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) तहसीलदार, परतूर यांनी अन्य ७ प्रकरणी केलेल्या दंडात्मक आदेशाच्या अनुषंगाने शासनस्तरावर दाखल अपिलावरील अंतिम निर्णयाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत येणाऱ्या कुंटुरकर निवासी दिव्यांग शाळेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२८) * ७३१३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत येणाऱ्या कुंटुरकर निवासी दिव्यांग शाळेतील पाच कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम काढून देण्यासाठी ४० लाख रूपयांची लाच घेतल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लाच घेताना ज्यांना रंगेहाथ पकडण्यात आले त्यांनी सदर लाचेची रक्कम जिल्हा समाज कल्याण अधिकारी, श्री.सत्येंद्र आऊलवार यांच्यासाठी स्वीकारल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मा.न्यायालयास देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच समाज कल्याण अधिकारी श्री.सत्येंद्र आऊलवार यांच्याकडून नांदेड जिल्ह्यातील दिव्यांग शाळांच्या संस्थाचालकांना दमदाटी करून बोगस शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे स्वतःच्या नातेवाईकांची शिक्षक व कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यास भाग पाडल्याच्या तक्रारी शासनाला प्राप्त झाल्या असून त्यांच्या नावे नांदेडसह मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर येथे मोठ्या प्रमाणात मालमत्ता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, असे असतांनाही त्यांच्याविरुद्ध शासनाने कोणतीही कारवाई न केल्याने लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सचिव, समाज कल्याण विभाग यांच्याकडे चौकशी व कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आणि त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, भाग्यनगर, जि.नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७-अ अन्वये गु.र.नं.५९०/२०२४, दिनांक २३.११.२०२४ रोजी ३ आरोपी लोकसेवकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार प्रथम खबरी अहवालाची प्रत नियमित प्रक्रियेनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मा.न्यायालयास सादर करण्यात आली आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०३.०४.२०२५ च्या पत्रान्वये चौकशी व कारवाईची मागणी केली आहे. त्यानुषंगाने आयुक्त, समाज कल्याण, पुणे व आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच श्री.सत्येंद्र आऊलवार यांचे मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने लाचलुपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरु आहे.
(५) सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदरचा अहवाल शासनास प्राप्त होताच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील विविध तहसीलदार कार्यालयात कागदपत्रांची पडताळणी न करता उत्पन्नाचे दाखले दिले जात असल्याबाबत

**(२९) * ८०९४ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील विविध तहसीलदार कार्यालयात नागरिकांकडे आवश्यक कागदपत्रे नसताना तसेच परप्रांतीय नागरिकांची कोणतीही कागदपत्रांची पडताळणी न करताच रहिवास आणि उत्पन्नाचे दाखले दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक कार्यालयात दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया वेगवेगळी असून बोरीवलीत

लागणारी कागदपत्रे कुर्ला येथे ग्राह्य धरली जात नाहीत, तसेच अंधेरी कार्यालयात वेगळेच निकष लावले जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने कार्यवाही न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा महा ई-सेवा केंद्रधारकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सर्व कार्यालयात दाखल्यांसाठी एक सारखेच निकष लावण्याकरीता व आवश्यक ती कागदपत्रे तपासून दाखले देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई शहर व उपनगरात महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण/ २०१२/प्र.क्र.१८/ई-१, दिनांक ३१.०३.२०१२ अन्वये "महसूल विभागामार्फत जनतेला दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले व विविध प्रकारच्या सेवांसाठी लागणारी प्रपत्रे, कालमर्यादा व शुल्क यांचे प्रमाणीकरण (Standardization) व नियमन (Regulation) करणे" या शासन निणर्यातील तरतुदींनुसार विहित पडताळणी प्रक्रिया पूर्ण करून नागरिकांना विविध प्रकारचे दाखले निर्गमित करण्यात येतात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भारी परीक्षेत्रामध्ये (ता.जि.यवतमाळ) शेताचे सपाटीकरण करण्याकरिता मुरुमाचे अवैध उत्खनन केल्याबाबत**

**(३०) * १३०४५ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) तालुक्यातील भारी परीक्षेत्रामध्ये शेताचे सपाटीकरण करण्याच्या नावाने खाजगी कंत्राटदाराकडून मागील दोन महिन्यापासून मुरुमाचे अवैध उत्खनन सुरु असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी मुरुमाचे अवैध उत्खनन सुरु असून काढलेला मुरुम रस्त्याच्या भराव कामांसाठी वापरून शासनाचा महसूल बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन महसूलाच्या वसूलीसह संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) मौजे भारी, ता.यवतमाळ येथील शेतजमीन ८/१/अ क्षेत्र ४.१९६ हे.आर. क्षेत्रामध्ये शेतजमीन सपाटीकरण करण्यास तहसीलदार, यवतमाळ यांनी परवानगी दिली आहे. सदर क्षेत्रातून निघालेल्या अधिकच्या गौण खनिजाची इतरत्र वाहतूक करण्यासाठी तहसीलदार, यवतमाळ यांच्यामार्फत परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर शेतजमिनीमध्ये सपाटीकरणात निघालेल्या अतिरिक्त गौण खनिज इतरत्र ठिकाणी हलविण्याकरिता देण्यात आलेल्या परवानगी व्यतिरिक्त संबंधितांनी सदर शेतजमिनीमध्ये किती गौण खनिज उत्खनन इतरत्र नेण्यासाठी केले आहे किंवा कसे ? याबाबत उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग यवतमाळ यांचेकडून मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व त्यामध्ये देण्यात आलेल्या परवानगीपेक्षा जास्त केल्याचे आढळून आल्यास नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भाताणे-बेलवाडी (ता.वसई, जि.पालघर) आदिवासी आश्रमशाळेतील**
**विद्यार्थीनींना दिलेली अमानुष शिक्षा**

**(३१) * १२६०६ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाताणे-बेलवाडी (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना (इयत्ता ४ थी) गृहपाठ न केल्याने १०० हून अधिक उठाबशा काढायला लावल्याची घटना दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेतील अमानुष शिक्षेमुळे चौथीतील तीन आदिवासी विद्यार्थिनींना गंभीर दुखापत होऊन त्यांची प्रकृती चिंताजनक झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत शिक्षिकेविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थिनीच्या कुटुंबियांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे आश्रमशाळेत पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा तसेच शाळेतील विद्यार्थ्यांकडे होत असलेले दुर्लक्ष यासंदर्भात समर्थन संस्थेने निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधीत शिक्षिकेला कठोर शिक्षा देण्याबाबत तसेच निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा भाताणे-बेलवाडी येथे शिकत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी स्वाध्याय पूर्ण केला नाही अशा विद्यार्थ्यांना उठाबशा काढण्याची शिक्षा दिली होती. परंतू, शिक्षा करण्यामागचा हेतू इजा करण्याचा नव्हता.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) प्रकल्प अधिकारी, डहाणू यांनी दिनांक ०७.०४.२०२५ रोजी संबंधित शिक्षिका व मुख्याध्यापक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांची वाचन, लेखन ही अध्ययन क्षमता विकसित होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थीनीला शिक्षा केली होती. तसेच यापुढे अशी चूक होणार नसल्याबाबत खुलासा सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पुरामध्ये नुकसान झालेल्या**
**पूरग्रस्तांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत**

**(३२) * ११४५८ श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पंचगंगा नदीस सन २०२४ मध्ये आलेल्या महापूरात नदीबूड क्षेत्रातील वस्त्यांमध्ये पाणी शिरुन नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पूरबाधितांच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून पंचनामे करण्यात आले परंतु, अद्यापही ७०० ते ८०० पूरग्रस्तांना आर्थिक मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इचलकरंजी शहर व पंचगंगा नदीच्या पूरबाधित क्षेत्रातील लाभार्थ्यांचे फेर सर्व्हेक्षण करुन अनुदानाची रक्कम देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२५ मध्ये तहसीलदार, इचलकरंजी व जिल्हाधिकारी (कोल्हापूर) यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने फेर सर्व्हेक्षण करुन पूरग्रस्तांना आर्थिक सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) सन २०२४ मध्ये मौजे इचलकरंजीमधील पूरपरिस्थिती मध्ये मौ.चंदूर येथील १६४ कुटुंबे व इचलकंरजी येथील १००८ कुटूंबे असे एकूण ११७२ बाधित कुटुंबाना स्थलांतरित करण्यात आले होते. शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२४/प्र.क्र.१८२/म-३, दिनांक ८ ऑगस्ट, २०२४ नुसार मदतीची बाब व निकष सदरामध्ये "दोन दिवसापेक्षा अधिक कालावधीकरिता क्षेत्र/घर पाण्यात बुडालेले असल्यास/घरे पूर्णतः वाहून गेली असल्यास/पूर्णतः क्षतीग्रस्त झाली असल्यास" अशा अनुदान वाटपाची तरतूद आहे. त्यानुसार मौजे चंदूर येथील ६० व मौजे इचलकरंजी मधील ५७८ असे एकूण ६३८ स्थलांतरित व निकषात पात्र ठरलेल्या कुटुंबांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे व उर्वरित मौजे चंदूर येथील १०४ व मौजे इचलकरंजी येथील ४३० असे एकूण ५३४ कुटुंब वरील निकषात अपात्र ठरलेने त्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले नाही.
(३) व (४) विधानसभा सदस्य इचलकरंजी यांनी दिनाक ४.०३.२०२५ रोजी फेर सर्व्हेक्षणाची मागणी केली. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी उपविभागीय अधिकारी इचलकरजी व तहसीलदार इचलकरंजी यांचेमार्फत फेर सर्व्हेक्षण केले. त्यामध्ये मौजे चंदूर येथील ६० कुटुंबे व मौजे इचलकरंजी येथील ५७८ कुटुंबे पूरबाधित झाले असल्याने एकूण ६३८ पूरबाधित कुटुंबाना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. मौजे चंदूर येथील १०४ व मौजे इचलकरंजी येथील ४३० असे एकूण ५३४ कुटुंब हे शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२४/प्र.क्र.१८२/म-३, दिनांक ८ ऑगस्ट, २०२४ नुसार फेर सर्व्हेक्षणात पात्र आढळून आलेले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गाच्या कामात करण्यात आलेल्या भूसुरुंग स्फोटांमुळे घरांच्या भिंतींना तडे गेल्याबाबत

**(३३) * १२१०९ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गाच्या वसई, पालघर, डहाणू व तलासरी (जि.पालघर) या तालुक्यातील कामाकरिता केलेल्या भूसुरुंग स्फोटांमुळे आजूबाजूच्या परिसरात जमिनींना हादरे बसून नागरिकांच्या घरांचे नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटामुळे गोवणे ग्रामपंचायत हद्दीतील वायेडापाडा व गावठाणपाडा या आदिवासी पाड्यातील जवळपास १० ते १२ घरांच्या भिंतीना मोठ्या प्रमाणावर तडे गेल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सदर आदिवासी पाड्यातील रहिवाशांनी ग्रामपंचायत व जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे तक्रार करुन योग्य उपाययोजना न झाल्यास किंवा नुकसान भरपाई न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त रहिवाशांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासह आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मौजे गोवणे येथील ग्रामपंचायत हद्दीमधील एकूण ०८ घरांच्या भिंतींना तडे गेल्याबाबत ग्रामस्थांनी दिनांक ०८.०४.२०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी, पालघर यांना अर्ज दिला होता. तथापि, सदर अर्जात आंदोलन करणार असल्याबाबत नमूद केलेले नाही.
(४) या अनुषंगाने सदर घरांची प्रत्यक्ष पाहणी करुन मौजे गोवणे गावचे ग्रामस्थ, सदर गावचे लोकप्रतिनिधी, एल.अँड टी.चे वरिष्ठ अधिकारी व नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनचे कर्मचारी यांचेसमवेत दिनांक १९.४.२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतील चर्चेनुसार त्रयस्थ अभियंता श्री.मिलींद चिंदीरकर यांचेमार्फत झालेल्या नुकसानीबाबत सर्व्हे करुन मोजमाप घेऊन मुल्यांकन केले आहे. सदर मुल्यांकनानुसार घरांची दुरुस्तीची रक्कम रु.४.७१ लाख व रु.३.५३ लाख (७५% सोलेटियम) अशी एकूण रु.८.२५ लाख एवढी येत असून सदर रक्कम नुकसानग्रस्तांना देण्यास एल.अँड.टी कंपनीने मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे उकणी व बेलसणी (ता.वणी, जि.यवतमाळ) गावातील जमीन निलजई डिप विस्तारीकरणासाठी संपादित करुन गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) * ११०९३ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उकणी व बेलसणी (ता.वणी, जि.यवतमाळ) या गावातील सन १९९० ते २०१५ पर्यंत अंदाजे १२०० एकर जमीन वेस्टर्न कोल्ड, लि.वणी येथील निलजई ओपनकास्ट माईनकरिता तसेच उकणी ओपनकास्ट माईनसाठी सन १९९३ ते २०१५ पर्यंत सुमारे १५५० एकर जमीन संपादित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निलजाई व उकणी माईन या दोन्ही प्रकल्पासाठी उकणी गावातील जवळपास ८५ टक्के जमीन संपादित केली असून उर्वरीत जमिनीतील शेती व्यवसाय संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावातील उर्वरित जमीन निलजई डिप विस्तारीकरणासाठी तात्काळ संपादित करुन गावाचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून वारंवार स्थानिक प्रशासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गावाचे पुनर्वसन न केल्यास दिनांक ९ जून, २०२५ रोजी वर्धा नदीजवळील पाण्याच्या टाकीजवळ जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा कोळसाखाण प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समिती, उकणी यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभुराज देसाई :** (१) व (२) मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि. च्या अहवालानुसार, वणी एरिया अंतर्गत खुल्या कोळसा खाणी करिता मौजा उकणी व बेलसणी परिसरात १९८७ ते २०१६ या कालावधीत जवळपास ११४२ हे. जमीन संपादित केली आहे.

तर वेकोलीच्या वणी नॉर्थ एरिया अंतर्गत, सन १९८७ ते २०१४ या कालावधीत ६७५.१८ हे. इतकी जमीन संपादित केली आहे.

(३) व (४) होय. हे खरे आहे.

(५) व (६) उकणी गावाचे पुनर्वसन, करण्याकरिता मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि. कंपनीकडून, सामाजिक-आर्थिक आधाररेषा (Base Line Socio Economic) सर्वे, गावातील जागेचे, घरांचे मोजमाप, घरांचे मुल्यांकन करणे इ. कार्यवाही झाली असून, घरांचे मुल्यांकनाबाबत प्राप्त काही आक्षेपांच्या अनुषंगाने सा.बां.विभागाकडून फेरमोजणी प्रस्तावित आहे. पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा निवडणे तसेच प्रकल्पग्रस्तांकडून विकल्प फॉर्म घेण्याची प्रक्रिया ग्रामपंचायतीमार्फत सुरु आहे.

पुनर्वसनाच्या अनुषंगाने, प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, उकणी यांचेकडून प्राप्त निवेदनासंदर्भात, मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि. कडून पुनर्वसनाच्या अनुषंगाने सदस्यांबरोबर झालेल्या चर्चेअंती, कंपनीकडून करण्यात येत असलेल्या सविस्तर कार्यवाहीच्या माहितीनंतर, संबंधीत गावकऱ्यांनी आंदोलन न करण्याचे आश्वासन कंपनी प्रशासनास दिले आहे.

त्याशिवाय, उर्वीरित जमीन अधिग्रहणाशी संबंधीत शेतकऱ्यांच्या मागण्या वेकोली, मुख्यालय, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## भामरागड व एटापल्ली (जि.गडचिरोली) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात दुधाळ गाय वाटप प्रकरणात झालेला गैरव्यवहार

**(३५) * ९१२२ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड व एटापल्ली (जि.गडचिरोली) येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या दुधाळ गाय वाटप योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहारात भारतीय प्रशासन अधिकारी तथा तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांचेविरुध्द पिडीत आदिवासींनी तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात दोषी आढळलेले तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांची विभागामार्फत विभागीय चौकशी सुरु करण्यात आल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन अपर आयुक्त यांनी चौकशी करुन शासनाकडे सादर केलेल्या अहवालात संबंधित अधिकारी दोषी असल्याचे नमूद असतानाही त्यांचेविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) (४) व (५) तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असल्याने त्यांच्याविरूद्ध अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ च्या नियम ८ नुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव शिफारशीसह व दोषारोपपत्रासह सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाव्दारे संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याच्या अनुषंगाने दिनांक १७ जून, २०२५ रोजी ज्ञापन बजावण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणात सहभाग असणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत उर्वरीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरूद्धही स्वतंत्ररित्या विभागीय चौकशी या विभागाकडून सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणात भात, नाचणी व वरी या पिकांची लागवड व देखभाल करण्याकरिता रोजगार हमी योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(३६) * १२५६१ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात भात, नाचणी व वरी ही मुख्य पिके असून या पिकांची लागवड करण्यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करीत असताना अतिवृष्टी व वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान होत असल्यामुळे शेतकरी उद्योग करण्यासाठी शहरांकडे जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील लोकांच्या स्थलांतरामुळे शेती तशीच पडून असून जमिनीची मशागत करण्यात येत नसल्याने जमिनीत पाणी मुरत नाही त्यामुळे उन्हाळ्यात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कोकणात भात, नाचणी व वरी या पिकांच्या लागवड व देखभालीसाठी या पिकांचा समावेश रोजगार हमी योजनेत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणात भात, नाचणी व वरी या पिकांची लागवड व देखभाल रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

कोकणामधील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे भात, नाचणी व वरी या पिकांचे सन-२०२०-२१ ते सन-२०२४-२५ या कालावधीत भात पिकाखालील २१०१६५ हे., नाचणी पिकाखालील ९३८ हे. तसेच वरी या पिकाखालील ६८ हे. क्षेत्र बाधीत झालेले आहे.

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते, अशी माहिती वनविभागामार्फत कळविण्यात आली आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, पेरणी ते कापणी अशा प्रकारची शेतीमधील मजूरीची कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत घेणेबाबत लोक प्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) पेरणी ते कापणी अशा प्रकारची शेतीमधील मजूरीची कामे रोजगार हमी योजनेंतर्गत घेणेबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनाने सदर विनंती अमान्य केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात खतांची कृत्रिम टंचाई दूर करुन खत लिंकिंग पद्धती बंद करण्याबाबत

**(३७) * ८०६०  श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (वैजापूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संजय देरकर (वणी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :**   सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात दरवर्षी निकृष्ट दर्जाची खते विकली जात असून केंद्रीय रसायने व खते शासनाच्या आकडेवारीनुसार मागील दोन वर्षात निकृष्ट खतांबाबत सर्वाधिक ३५४७ तक्रारी राज्यात नोंदविण्यात आल्या असल्याचे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक खतासोबत देण्यात येणारे लिंकिंग खत जास्त दराचे असल्याने शेतकरी ते घेत नसतानाही लिंकिंग करणाऱ्या खत उत्पादक कंपनीवर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील चार-पाच वर्षांपासून राज्यातील अनेक रासायनिक खत उत्पादक कंपन्या विक्रेत्यांकडून मागणी नसताना लिंकिंग पद्धतीने इतर खते विकण्यास भाग पाडणे, सदर खते शेतकऱ्यांकडून खरेदी केली जात नसल्यामुळे विक्रेत्यांवर अनावश्यक आर्थिक बोजा वाढल्याने किरकोळ विक्रेते अडचणीत येत असून राज्यातील ७० हजार खत विक्रेत्यांनी दिनांक १ मे, २०२५ रोजीपासून खत खरेदी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात ऐन खरीप हंगामात बनावट खते विक्री होत असून युरिया खतासह डीएपी खतांची दुकानदारांकडून कृत्रिम टंचाई करुन खते जादा दराने विकण्यात येत आहेत तसेच काही दुकानातून अन्य खते लिंकिंग करुन विकली जात असून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या दुकानदारावर कारवाई न केल्याने शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत एन.एफ.एल. व आर.सी.एफ. या कंपन्यांनी अपेक्षित खत पुरवठा न करता अत्यंत कमी खत पुरवठा करणे तसेच बॅग खत पुरवठा होणे अपेक्षित असतानाही करण्यात आला नसल्याने त्याबाबतचे निवेदन स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.कृषी मंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार खतांची कृत्रिम टंचाई दूर करुन खत लिंकिंग करावयास लावणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यासह चांगल्या दर्जाची खते शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) कृषि आयुतालयास खतांच्या बाबतीत विविध कारणास्तव, सन २०२३-२४ मध्ये ३०५, सन २०२४-२५ मध्ये २६२ व सन २०२५-२६ मध्ये १३९ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) नाही.
(३) दिनांक १ मे, २०२५ पासून खत खरेदी बंद करण्याबाबत महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड, सिड्स डिलर्स असो, पुणे या विक्रेते संघटनेने शासनास दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी निवेदन दिले होते.
(४) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(५) होय.
(६) राज्यामध्ये दर्जेदार खतांची निर्मिती व पुरवठा होण्यासाठी खत उत्पादक व विक्रेते यांची नियमित तपासणी केली जाते. सन २०२४-२५ मध्ये उत्पादक व विक्रेते यांच्या एकूण ४८०५७ तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. राज्यात सन २०२५-२६ मध्ये माहे जून, २०२५ अखेर २३०२२ विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. खत उत्पादक व विक्रेते यांनी खतांमध्ये लिंकींग करु नये यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी बैठका घेऊन खत उत्पादक व विक्रेते यांना सूचना दिलेल्या आहेत.

राज्यामध्ये भेसळयुक्त खताची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर माहे जून, २०२५ अखेर २५ पोलीस केस दाखल करण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये एकूण ४१३३७ कृषि विक्रेता केंद्रावर लिंकींग न करणे बाबत फलकाद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा व राज्यस्तरावर लिंकींग बाबत तक्रार दाखल करणेसाठी नियंत्रण कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे.

-----------------

## मौजे कांबे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जमिनीतून दगड माती या गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन केल्याबाबत

**(३८) * १२६६० श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कांबे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर १०८/२ या जमिनीमधून ८,७८२ ब्रास दगड व १०,७०७ माती या गौण खनिजाचे विनापरवाना उत्खनन केल्याने स्वामित्व धनापोटी जमीन मालकास २३ कोटी रुपयांचा दंड आकारल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दंडाची रक्कम नोटीस आल्यापासून पंधरा दिवसात भरण्याबाबतचे आदेश दिले असून जमीन मालकाने उक्त रकमेचा भरणा केला आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक ०१.०४.२०२५ अन्वये संबंधितांविरूध्द अनधिकृत गौण खनिज उत्खननबाबत रू.२३,४०,९८,५२०/- एवढ्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित करण्यात येवून सदर रक्कम १५ दिवसात भरण्याचे आदेश दिले आहेत. संबंधितांनी सदर रकमेचा भरणा न केल्याने संबंधितांस महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत नमुना १ ची नोटीस दिनांक २३.०५.२०२५ रोजी व २ ची नोटीस दिनांक १६.०६.२०२५ रोजी बजाविण्यात आलेली आहे.

तसेच, संबंधितांच्या मालकीचे मौजे कांबे येथील ग.नं.१०८/२, १११/७, १०७, १०८/६, १११/२, १११/६, २६/२, १/१, ५/५, ६/३, ७/१, १३/१, २६/१, २७/१ ,२९/१अ, ९५/२०, १०५/१, १०५/२ व ११५ या मिळकतींच्या गा.न.नं. ७/१२ वर दंडात्मक रकमेचा बोजा चढविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## बीड-परळी (जि.बीड) रस्त्याजवळील पांगरवाडी शिवारामध्ये मे.गुरुमाऊली स्टोन क्रशरकडून अवैध उत्खनन केल्याबाबत

**(३९)** * **१०८९० श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड-परळी (जि.बीड) रस्त्याजवळील पांगरवाडी शिवारामध्ये मे.गुरुमाऊली स्टोन क्रशर सुरु असून या स्टोन क्रशरकडून शासनाची परवानगी न घेता अवैध उत्खनन करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवैध उत्खननाबाबत चौकशी करण्यात यावी, अशी विनंती संबंधित लोकप्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी बीड, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी, बीड व तहसीलदार, बीड यांच्याकडे दिनांक १५ मे, २०२५ रोजी लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अधिनियम, १९६६ कलम २४७ अन्वये व सुधारित गौण खनिज अधिनियमाद्वारे चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुरु माऊली स्टोन क्रशरला दिनांक १८.०६.२०१६ अन्वये प्रमाणपत्र (CTO-Constent to operate) दिलेले असून, त्याची वैधता दिनांक ३०.०६.२०२६ पर्यंत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित ठिकाणी केलेल्या ईटीएस मोजणीत ५६२६.८४ ब्रास उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे. संबंधितानी आजरोजीपर्यंत एकूण रु.१५,००,०००/- एवढ्या रकमेचे स्वामित्वधन शासन जमा केले आहे. उर्वरित स्वामित्वधनाच्या रकमेचा ताळमेळ घेवून उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## उल्हास तसेच वालधुनी नदीपात्रात (जि.ठाणे) हजारो ब्रास मातीचा भराव टाकून नदीपात्र बुजवून प्रवाह रोखल्याबाबत

**(४०) * ८३६९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील उल्हास नदीपात्रात हजारो ब्रास मातीचा भराव टाकून नदीपात्र बुजवून नदीचा प्रवाह रोखला जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदीपात्रात मातीचा भराव करण्यात येत असून नदीचा प्रवाह रोखून अनधिकृतरित्या सिमेंट भिंत बांधली जात असून सदर बांधकामाकडे स्थानिक तहसीलदार व महसूल विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वालधुनी नदी देखील सगळ्यात जास्त प्रदूषित झाली असून तेथील नदीपात्रात विकासकांनी अतिक्रमण करुन मोठमोठे बिझनेस सेंटर, गृहसंकुले उभारली असून त्याबाबत जिल्हाधिकारी तसेच महसूल विभागाकडे तक्रारी करुनही त्यांनी दखल घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त नदीपात्रातील अतिक्रमण व नदी प्रदूषण रोखण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वालधुनी नदी पत्रात उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोणतेही बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याने निदर्शनास आलेले नाही. वालधुनी नदीच्या काठावर सुरू असलेल्या बेकायदेशीर बांधकामावर तहसीलदार, उल्हासनगर यांनी कार्यवाही केली आहे.

अंबरनाथ नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका या क्षेत्रातून ६६ दश लक्ष लिटर घरगुती सांडपाण्यावर प्रक्रीया करून वालधुनी नदीमध्ये विसर्जित केले जाते. परंतु, उर्वरित ४०.५ दशलक्ष लिटर विनाप्रक्रीया केलेले पाणी विसर्जित केल्यामुळे अंबरनाथ नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिका यांना अनुक्रमे दिनांक २१.०५.२०२५ व २६.०५.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहेत. तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या क्षेत्रातून निघणाऱ्या संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रीया करत नसल्याने कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(४) मौजे कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील ग.नं ५६/२/३, ५९/१, ५९/२, ५९/४, ५९/५, ५९/६, ५९/७, ६५/१, ६५/३, ६५/४, ६५/५, ६५/८, ६५/१० व ६५/११ या क्षेत्रातुन मातीचे उत्खनन करून नदी पात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले, त्यानुषंगाने दिनांक २४.०४.२०२५ रोजी निवासी नायब तहसीलदार, अंबरनाथ, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली असता, सदर जागेवर ८९१२ ब्रास माती उत्खनन, १६६ ब्रास दगड साठा व ८३ ब्रास दगड पावडर आढळून आले. त्याबाबतच्या गौण खनिजासाठी रू.०९,९३,६७,१४१/- व वापरण्यात आलेल्या यंत्र सामग्रीसाठी रू.२२,५०,०००/- अशा एकूण रू.१०,१६,१७,१४१/- एवढ्या दंडात्मक रकमेचे दिनांक १६.०५.२०२५ रोजी आदेश तहसीलदार, अंबरनाथ यांनी संबंधितांविरूध्द दिले आहेत. तसेच यामध्ये वापरण्यात आलेली यंत्र सामग्री जप्त करण्यात आली आहे.

संबंधितांना उल्हास नदीपात्रामध्ये अनधिकृत केलेला भराव / साठा काढून टाकून नदीपात्र पूर्ववत करण्याबाबत संबंधितास निर्देश दिले होते. परंतु, संबंधितांनी सदर भराव न काढल्याने त्यांच्याविरूध्द अंबरनाथ

पोलीस स्टेशनला संबंधित संस्थेविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७), आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ (बी) व भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३ कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

तसेच संबंधित संस्थेस उल्हास नदी पात्रात केलेला अनधिकृत भराव काढून संस्थेच्या जागेत टाकणे व नदीपात्र पूर्ववत करण्यास येणारा खर्चाचे देयक संबंधित संस्थेकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्याबाबत तहसीलदार, अंबरनाथ यांनी दिनांक ०३.०६.२०२५ अन्वये मुख्यधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांना कळविले आहे. त्यानुषंगाने उल्हास नदी पात्रात अनधिकृतपणे केलेला भराव काढून टाकण्याची कार्यवाही मुख्यधिकारी, कुळगाव बदलापूर, नगरपरिषद यांच्याकडून सुरू आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील वन परिक्षेत्र अधिकारी (मांडवी) या कार्यक्षेत्रातील वन जमिनीवर अनधिकृत औद्योगिक बांधकामे केल्याबाबत

**(४१)** * **८६९१ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील वन परिक्षेत्र अधिकारी (मांडवी) या कार्यालयाच्या कायक्षेत्रातील वन जमिनीवर मोठ्या प्रमाणावर औद्योगिक बांधकामे सुरू असून त्यासाठी डोंगर पोखरण्यात आल्याची घटना माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकामांना संरक्षण दिल्याने मौ.पेल्हार येथील एकूण १३ सर्व्हे नंबर तसेच मौ.पारोळ येथे १ सर्व्हे नंबर ११९ व बावखळ येथे रशिद कंपाऊंड लगतच्या वन जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात वन विभागाने चौकी समोरच सिमेंट कॉंक्रीटचा पाया तयार करून बांधकाम करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन जमिनीवरील बेकायदा बांधकामांबाबत अनेक तक्रारी प्राप्त होऊनही वन परिक्षेत्र अधिकारी मांडवी, मुख्य वन संरक्षक प्रादेशिक, ठाणे या अधिकाऱ्यांकडून त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन जमिनीवरील बेकायदा बांधकामांना जबाबदार असलेल्या वन अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) वनपरिक्षेत्र मांडवी मधील कार्यक्षेत्रातील मौजे पेल्हार संरक्षित वन स.क्र.३२७ क्षेत्रामध्ये माहे मार्च, २०२५ मध्ये माती उत्खननाबाबत वनपाल, माजीवली यांनी रौंड वनगुन्हा क्र.M-४/२०२५ नोंदविला असून सदर गुन्ह्यात ४ वाहने जप्त करण्यात आली आहेत. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच मौजे पेल्हार येथील संरक्षित वनाच्या वाटप क्षेत्रामध्ये अतिक्रमणाच्या बाबींच्या अनुषंगाने १८ वनगुन्हे नोंद करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे. मौजे पेल्हार येथील स.क्र.३३० मध्ये ५२१ व स.क्र.२८१ मध्ये २५ अतिक्रमणधारकांना नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.

मौजे पारोळ येथील स.क्र.११९ हे खाजगी वन असून त्याबाबतची नोंद सन २००५ मध्ये घेण्यात आली असून त्यावरील निवासी बांधकाम सन २००२ मध्ये झालेले आहे. सदर क्षेत्रावर कोणतेही नवीन औद्योगिक बांधकाम झालेले नाही.

मौजे पेल्हार येथील बावखळ येथील राशिद कंपाऊंड लगत संरक्षित वन स.क्र.३५४ मध्ये अनधिकृत बांधकामांबाबत एकूण ५ वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच मौजे पेल्हार येथील सर्व्हे क्र.३५४ मध्ये १९ अतिक्रमणधारकांना नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे मौजे पेल्हार येथे प्रादेशिक वन विभागाची चौकी नाही. तथापि, सदर भागात पाया बांधकाम झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द रौंड वनगुन्हा क्र.ई-१७/२०२५ दिनांक २०/०६/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

मांडवी वन परिक्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२५ पासून अतिक्रमण संबंधी ३१ वनगुन्हे नोंद करण्यात येऊन ७२ अतिक्रमणे निष्कासीत करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यांत व तालुक्यांत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे नागरिक व जनावरांचा मृत्यू होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(४२) * ७०८६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांत व तालुक्यांत (रानडुक्कर, वानर, माकडे, गवारेडा, वाघ, बिबट्या, नीलगायी, हरिण, हत्ती, अस्वल, साप, रोही व इतर वन्य प्राणी) या वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून यात अनेक नागरिक, वृद्ध, लहान मुले तसेच गुरे व जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना माहे एप्रिल-मे, २०२५ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वन्य प्राण्यांच्या उपद्रवाने फळबागा व शेतीपिकांचे देखील नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्य प्राण्यांकडून होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून वन्य प्राण्यांचे निर्बिजीकरण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे वन्यजीव व मानव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी तसेच मोकाट फिरणाऱ्या वन्य प्राण्यांचा बंदोबस्त टास्क फोर्स तयार करुन आवश्यक ठिकाणी पिंजरे लावण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे पंचनामे करुन वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत व जखमी झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह सक्षम उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) राज्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य मृत्यूच्या, मनुष्य हानीच्या, पशुधन हानीच्या व शेत पिक नुकसानीच्या एकूण सन २०२०-२१ मध्ये ४४६९२, सन २०२१-२२ मध्ये ४७२८३, सन २०२२-२३ मध्ये ५४५८८, सन २०२३-२४ मध्ये २३७८४१ व सन २०२४-२५ मध्ये १७८६४६ घटना निदर्शनास आल्या असून प्रस्तुत प्रकरणी प्रचलित नियमातील तरतुदीनुसार संबंधितास अनुक्रमे रु.८०.०० कोटी, रु.८०.०० कोटी, १२७.१० कोटी, रु.१४५.०० कोटी व रु.२२०.८६ कोटी इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम १२ अंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर जुन्नर वन विभागातील ऊस पिकामध्ये वास्तव्य करणाऱ्या बिबट्यांना जेरबंद करुन नसबंदी करण्याचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२४ मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आला असून त्यास अद्याप मान्यता अप्राप्त आहे.

(४) हे खरे आहे.

विभागनिहाय मानव वन्यजीव संघर्ष हाताळणे कामी शिघ्र कृतीदल कार्यान्वित करण्यात आलेले असून त्यांना मानव-बिबट्या संघर्षाची परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिघ्रकृती दलाकडे अत्याधुनिक साधन सामग्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(५) व (६) वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

-----------------

## पुणे जिल्ह्यामध्ये अनधिकृत डोंगरफोडीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याबाबत

**(४३) * ९१२१ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील पानशेत रस्ता व इतर काही भागांमध्ये अनधिकृत डोंगरफोड सुरू असून कोणत्याही परवानगीशिवाय खनिज उत्खनन, झाडांची तोड होत असून राडारोडा टाकण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कात्रज, कोंढवा, येवलेवाडी व इतर ठिकाणी अनधिकृत प्लॉटिंग करुन त्यांची विक्री करणे व अवैध उत्खनन मोठ्या प्रमाणात होत असल्याने सदर प्लॉट विक्री व उत्खनन करणाऱ्यांवर तीन दिवसांत गुन्हे दाखल करुन त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे मे, २०२५ मध्ये घेतलेल्या बैठकीत दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त जिल्ह्यातील डोंगरफोडीमुळे भूगर्भ जलस्तर, जैवविविधता, परिसरातील हवामान व लोकजीवन यावर झालेल्या परिणामाबाबत अभ्यास करून अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पर्यावरणास हानीकारक असलेल्या अवैध उत्खनन व डोंगरफोडीवर नियंत्रण आणण्याकरिता तसेच अनधिकृत प्लॉट विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे.

(२) पुणे शहरातील कात्रज, कोंढवा, येवलेवाडी येथील अनधिकृत प्लॉटींगच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये (१) अनधिकृत उत्खननाबाबत कायद्यातील

तरतुदी तपासून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्याबाबत तहसीलदार, हवेली ता.हवेली, जि.पुणे तसेच (२) अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत पुणे महानगरपालिकेने तातडीने कारवाई करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना निर्देश दिले आहेत.

(३) पुणे पश्चिम चक्राकार मार्गाचे बांधकामासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल या मंत्रालयाची Environmental Clearance (EC) प्राप्त असून त्यात नमूद अटी शर्तींची पूर्तता करणेत येत आहे. विषयांकित बांधकाम नुकतेच सुरु करण्यात आले असून कामाच्या प्रगतीनुसार वेळोवेळी डोंगर फोडीमुळे भूगर्भ जलस्तर, जैवविविधता, परिसरातील हवामान व लोकजीवन यावर होणाऱ्या परिणामाबाबत अभ्यास करुन अहवाल तयार करुन State Environmental Impact Assessment Authority (SEIAA) Maharashtra यांना सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) अवैध गौण खनिज उत्खननाबाबत तहसीलदार, हवेली यांनी ९ प्रकरणामध्ये १६,०९,००,९५५/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केलेले असुन पुढील वसूलीची नियमोचित कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन सुरु आहे.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या आरक्षित जागेत तसेच हिलटॉप हिलस्लोप जागेवर अनधिकृत प्लॉटिंग करुन बांधकाम, अनधिकृत गोडाऊन, अनधिकृत रस्ते, अनधिकृत प्लॉटिंग याबाबत विकास प्राधिकरण हे पुणे महानगरपालिका असल्याने पुणे महानगरपालिकेने अनधिकृत प्लॉटिंग व बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ४३ व ५२ अन्वये कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हे दाखल केले आहेत.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## अकोला, यवतमाळ व बुलढाणा येथे उपविभागीय कृषी अधिकारी यांनी पदाचा गैरवापर करुन नातेवाईकांची केलेली नियमबाह्य नेमणूक

**(४४) * १२८९६ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, यवतमाळ व बुलढाणा येथे उपविभागीय कृषी अधिकारी यांनी तत्कालीन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असताना लेखा परीक्षण पथकाने कोट्यवधी रुपयांचे ताळमेळ लागत नसल्याने व नोंदवह्या अपूर्ण तसेच नोंदी नसल्याचे आक्षेप लावण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय कृषी अधिकारी या पदावर कार्यरत असताना सन २००८ मध्ये जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्यामार्फत वर्ग-४ ची पदे भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करून पदे भरतीसाठी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फोडून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वर्ग-४ ची पदे भरण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांनी स्वतःच्या नातेवाईकांना नियमबाह्य पद्धतीने नेमणूक देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात कृषी आयुक्तालय व शासनाच्या कृषी विभागाच्या आस्थापना शाखेतील अधिकारी यांच्यासमवेत सुमारे ८ वर्षांनी विभागीय चौकशी सुरु केली तसेच प्राथमिक चौकशी अहवाल प्रलंबित असतानाही शासनाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी या पदावर पदोन्नती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपविभागीय कृषी अधिकारी यांनी पदाचा गैरवापर करुन त्यांच्या खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे नातेवाईकांचा समावेश करुन जास्तीत जास्त गुण मिळाले असल्याचे विभागीय चौकशीत दोषारोप सिद्ध झाले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपविभागीय कृषी अधिकारी यांनी परिक्षा पेपरफूटीत सहकार्य केल्याचा गुन्हा करुनही फौजदारी गुन्हा दाखल करण्याऐवजी मोठी आर्थिक देवाण-घेवाण करुन त्यांची विभागीय कृषी सहसंचालक या पदावर (अमरावती) येथे पदस्थापना करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) कृषी आयुक्तालयाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांचेविरुद्ध प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा कार्यालयाची सन २००९ ते २०१५ या कालावधीतील आर्थिक पडताळणी केली असून आयुक्तालयाच्या दिनांक २१/६/२०१९ च्या पत्रान्वये लेखापरीक्षण अहवाल निर्गमित केला आहे.

लेखापरीक्षणाचे अनुषंगाने अनुपालन अहवाल ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असल्याबाबत विभागीय कृषी सह संचालक, अमरावती यांना आयुक्तालयाच्या दिनांक १८/२/२०२५ च्या स्मरणपत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार, विभागीय कृषी सह संचालक अमरावती यांनी दिनांक ७/३/२०२५ रोजीचे पत्रान्वये अनुपालन अहवाल कृषी आयुक्तालयास सादर केला असून त्यापैकी एकूण १८ परिच्छेदांपैकी ३ परिच्छेद मान्य केल्याचे आयुक्तालयाच्या दिनांक २४/०३/२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

उर्वरित लेखा आक्षेपांचे सुधारित अनुपालन अहवाल विभागीय कृषी सह संचालक, अमरावती यांचे दिनांक २७/६/२०२५ चे पत्रान्वये कृषी आयुक्तालयास सादर केले असून पुढील कार्यवाही आयुक्तालयाच्या स्तरावर कार्यान्वित आहे.

(२) ते (७) सन २००८ मध्ये जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील वर्ग-४ (गट-ड) ची पदे भरण्याकरीता आयोजित करण्यात आलेल्या परिक्षेमधील अनियमिततेप्रकरणी संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी, बुलढाणा व इतर २ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम ८/१२ अनुसार शासनाच्या दिनांक ३१/१०/२०१० च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली.

सदर भरती प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सदर परिक्षा रद्द करण्यात आली आहे.

या प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी दिनांक ०६/०५/२०२४ रोजी चौकशी अहवाल शासनास सादर केला. सदर चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेता, संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये "सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात आली तसेच शासनाला झालेल्या रु.२५,९४८/- इतक्या आर्थिक नुकसानीची वसूली त्यांच्या वेतनातून करण्यात यावी" असेही आदेशित करण्यात आले आहे. उर्वरित दोन अपचारी यांना ते सेवानिवृत्त झाले असल्याने अंतरिम शिक्षा कळवून दिनांक २९/०५/२०२५ रोजी दुसरी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही कार्यान्वित आहे.

संबंधित उप विभागीय कृषी अधिकारी, यांना दिनांक १२/३/२००८ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली, त्यावेळी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु नव्हती. तसेच, संबंधित अधिकारी यांची विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांना विभागीय कृषी सह संचालक या पदावर दिनांक १५/१०/२०२४ रोजी पदोन्नती देण्यात आली आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील आदिवासींमध्ये जनजागृती, रोजगार निर्मिती करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता करावयाच्या उपाययोजना

**(४५) * १२६११ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी**

**पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासींना शिक्षण व रोजगाराअभावी येणारे दारिद्र्य व व्यसनाधीनतेमुळे त्यांची प्रगती होत नसून आर्थिक स्थैर्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रायगड जिल्ह्यात कातकरी समाजात मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा अभाव असून पर्यायाने रोजगार उपलब्ध नसून बालविवाह पद्धती व अज्ञानामुळे मुली गर्भवती राहत असून कर्जत तालुक्यात दरवर्षी आठ ते दहा अल्पवयीन मुली माता बनत असल्याचे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा गर्भवतींना बाळंतपणासाठी रुग्णालयात दाखल करताना माता अल्पवयीन आढळल्यास डॉक्टरना पोलिसांत कळविणे अनिवार्य असल्याने पोलीस नोंद होऊन पॉक्सो अंतर्गत पोलिसात गुन्हा दाखल झाल्यास बाळाच्या वडीलांना अटक केल्यानंतर संपूर्ण कुटुंब उद्धवस्त होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींमध्ये जनजागृती करून रोजगार निर्माण करण्यासाठी व आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.

(२) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सन २०२४-२५ मध्ये २७ व सन २०२५-२६ (मे अखेर) मध्ये ७ अल्पवयीन कातकरी समाजाच्या गर्भवती मातांची नोंद झालेली आहे.

(३) पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या अहवालानुसार जानेवारी ते मे, २०२५ पर्यंत पॉक्सो अंतर्गत आदिवासी समाजाशी संबंधित १२ प्रकरणी गुन्ह्याची नोंद असून त्यापैकी कर्जत तालुक्यातील २ प्रकरणे आहेत. त्यातील ५ प्रकरणी आरोपी न्यायालयीन कोठडीत असून ३ प्रकरणी आरोपी विधी संघर्षीत बालक असल्याने पालकांच्या ताब्यात आहे.

(४) राज्यातील आदिवासी समाजाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. स्वयंरोजगारासाठी वित्तीय सहाय्य करण्यात येते.

राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ४९९ शासकीय, ५५६ अनुदानित, १६२ नामांकित, ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल कार्यरत असून त्यामध्ये सुमारे ५ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी तसेच परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण येथील वन विभागातील विकासाच्या कामांबाबत

**(४६) * १२६६७ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण येथील वनक्षेत्रपाल तथा प्रादेशिक वनक्षेत्र अधिकारी हे वन विभागातील विकास कामांचे जिओ-टॅगिंग वा प्रत्यक्ष पाहणी अहवालावर सह्या करून, आपल्या मर्जीतील

ठेकेदारांनाच विकास कामांच्या निविदा देऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२४ ते मे, २०२५ या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच निविदा प्रक्रियेत किती निविदा धारकांनी भाग घेतला तसेच उक्त कालावधीमध्ये वन विभागात एकूण किती व कोणती विकास कामे करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तसेच संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.
(२) उक्त कालावधीमध्ये ठाणे वन विभागामध्ये ई-निविदेने एकूण ६२ कामे करण्यात आलेली आहेत. त्यात सिमेंट काँक्रीट बंधारा, संरक्षण भिंती, लेबर शेड उभारणे, वनक्षेत्रात क्लास १ व क्लास २ बाउंड्री पिलर्स उभारणे, चेनलिंक फेन्सीग करणे, वॉच टॉवर, वनपाल वनरक्षक निवासस्थान बांधणे, गॅबियन बंधारे बांधणे इ. विकास कामे करण्यात आलेली आहे. एकूण ६२ ई-निविदांमध्ये ६२ कामांसाठी १८२ निविदाधारकांनी भाग घेतला असून एकूण २८ वेगवेगळ्या निविदाधारकांना ६२ कामे ई-निविदेद्वारे वाटप झालेली आहेत. सदर प्रक्रिया नियमानुसार पार पडली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे अर्नाळा बंदर पाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जमिनीवरील अनधिकृत झोपड्यांबाबत

**(४७) * १३८०१ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अर्नाळा बंदरपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील स.नं ५६-अ या सरकारी जमिनीचा वापर स्थानिक कोळी बांधव मासेमारीच्या जाळया दुरूस्तीकरिता व मुलांच्या खेळाकरीता करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जमिनीवर भूमाफियांकडून अनधिकृतपणे झोपड्या बांधण्यात आल्याने अर्नाळा बंदरपाडा येथील स्थानिक ग्रामस्थांनी सन २०१९ पासून आत्तापर्यंत या अतिक्रमणाविरूध्द शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ५ वर्षांनंतर तक्रारींची दखल घेवून तहसीलदार (वसई) यांनी पोलीस ठाणे (अर्नाळा) तसेच परिमंडळातील एकूण ८ मंडळ अधिकारी यांच्या समक्ष दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी जे.सी.बी.व्दारे अनधिकृत झोपड्यांवर कारवाई करून भूखंड मोकळा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कारवाईनंतर भूमाफीयांकडून पुन्हा त्याच जागेवर झोपड्या बांधण्यात आल्याच्या तक्रारी स्थानिक समाज बांधवानी तहसीलदार यांना दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या अर्जाव्दारे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

मौजे अर्नाळा, ता.वसई येथील स.क्र.५६/अ, एकूण क्षेत्र १२.०१.८० हे.आर या जमिनीच्या ७/१२ वर कब्जेदार सदरी 'गुरचरण' नोंद आहे. सदर जमिनीवर अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्याने, वसई-विरार शहर महानगरपालिकेने दिनांक ०८.०४.२०२५ रोजी पोलीस स्टेशन, अर्नाळा यांच्याकडील पोलीस बंदोबस्तासह सदरच्या अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण निष्कासित केले होते व सदर कारवाईमध्ये दिनांक ११.०४.२०२५ रोजी ०८ इसमांविरूद्ध अर्नाळा सागरी पोलीस ठाणे येथे FIR क्र.०४४ दाखल करण्यात आली आहे.

तसेच उक्त कारवाईनंतर, सदर जमिनीवर नव्याने ०६ झोपड्या उभारल्याबाबत अर्नाळा बंदरपाडा मांगेला कोळी समाज यांनी तहसीलदार, वसई यांच्याकडे दिनांक १०.०६.२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक २७.०६.२०२५ च्या पत्रान्वये सदर जमिनीवरील अनधिकृत झोपड्या महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार तात्काळ निष्कासित करणेबाबत सहायक आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका, पोलीस निरीक्षक अर्नाळा, उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, ग्राम महसूल अधिकारी अर्नाळा व मंडळ अधिकारी, आगाशी यांचेमार्फत संयुक्तपणे कारवाई दिनांक ०८.०७.२०२५ रोजी नियोजित केले असल्याचे कळविले आहे.

तहसीलदार, वसई यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना वेळोवेळी सदरच्या शासकीय जमिनीची पाहणी करुन, जमिनीवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणेबाबत लेखी व आढावा बैठकीमध्ये सूचना दिलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.